महाराष्ट्र शासन

# ग्राम विकास विभाग

# राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण

## घरकुल स्वप्नपूर्ती




# महा आवास

त्रैमासिक

एप्रिल ते जून २०२१




ई-गृहप्रवेश कार्यक्रमा प्रसंगी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे स्वागत करताना मा.मंत्री, ग्राम विकास, श्री.हसन मुश्रीफ




ई-गृहप्रवेश कार्यक्रमा प्रसंगी मा.मंत्री, ग्राम विकास, श्री.हसन मुश्रीफ यांचे स्वागत करताना मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री.राजेश कुमार



ई-गृहप्रवेश कार्यक्रमा प्रसंगी मा.मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, श्री.धनंजय मुंडे यांचे स्वागत करताना मा.मंत्री, ग्राम विकास, श्री.हसन मुश्रीफ



ई-गृहप्रवेश कार्यक्रमा प्रसंगी मा.राज्यमंत्री, ग्राम विकास व महसूल, श्री.अब्दुल सत्तार यांचे स्वागत करताना मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री.राजेश कुमार

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# ग्राम विकास विभाग

## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय

## महा आवास

| | |
|---|---|
| मार्गदर्शक | राजेश कुमार, भा.प्र.से.<br>अतिरिक्त मुख्य सचिव,<br>ग्राम विकास व पंचायत राज विभाग |
| मुख्य संपादक | डॉ. राजाराम दिघे,<br>संचालक,<br>राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण |
| प्रबंध संपादक | मंजिरी टकले, उपसंचालक<br>नीलेश काळे, उपसंचालक<br>संतोष भांड, सहा. संचालक (लेखा) |
| कार्यकारी संपादक | संजय घोगळे, सहा. लेखाधिकारी<br>दिनेश मोवळे, प्रशिक्षण समन्वयक |
| सहाय्यक संपादक | डॉ. संघरत्न सोनवणे<br>राम आघाव<br>परमेश्वर शेलार<br>तौसिफ सौदागर<br>संतोष पानसरे<br>अनिल काळे<br>मायकल जॉन<br>संदीप मुंढे |
| मुख्यपृष्ठ मांडणी व सजावट | दिनेश मोवळे<br>प्रशिक्षण समन्वयक<br>(माहिती, शिक्षण व संवाद) |
| संपादकीय पत्ता | संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-<br>ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय<br>४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन,<br>सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४ |
| संकेत स्थळ | www.pmayg.nic.in<br>www.mahaawaas.com |
| ईमेल | directoriayruralhousing@gmail.com |
| दूरध्वनी क्रमांक | ०२२ - २७५६१८२४ |

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | संपादकीय | १ |
| २ | विशेष - महा आवास अभियान-ग्रामीण ई-गृहप्रवेश कार्यक्रम | ३ |
| ३ | ई-गृहप्रवेश कार्यक्रमा प्रसंगी मान्यवरांचे संदेश | ६ |
| ४ | विविध उपक्रमांचा मागोवा क्षमता बांधणी उपक्रम | १० |
| | संनियंत्रण व मूल्यमापन उपक्रम | १२ |
| | माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम | १६ |
| | समन्वय उपक्रम | २० |
| | केंद्र व राज्य सरकार यांना ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासंबंधित पॉलिसी इनपुट | २२ |
| ५ | ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा संचित प्रगती अहवाल प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण | २३ |
| | रमाई आवास योजना | २४ |
| | शबरी आवास योजना | २५ |
| | पारधी आवास योजना | २६ |
| | आदिम आवास योजना | २७ |
| | यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना | २७ |
| ६ | ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रम/ यशोगाथा | २८ |
| ७ | फोटो गॅलरी | ३४ |
| ८ | मिडिया कवरेज | ३५ |


वर्ष १ ले । अंक ४ था । एप्रिल ते जून २०२१



**डॉ. राजाराम दिघे**
**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण**

दिनांक १५ जून २०२१ रोजी मा. मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य, मा. मंत्री, ग्राम विकास, मा.मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, मा.राज्यमंत्री ग्राम विकास व महसूल, मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, मा.प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव व सचिव यांच्या प्रमुख उपस्थितीत व त्यासोबत व्हिडिओ कॉन्फरन्सींद्वारे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), गट विकास अधिकारी (पंचायत समिती), ग्रामपंचायत स्तरावर ग्रामसेवक तसेच राज्यातील मा. मंत्री व मा.लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत ई - गृहप्रवेश व महा आवास अभियान सांगता समारंभ पार पडला. यावेळी यशोगाथा पुस्तिका व दिनदर्शिका यांचे प्रकाशन करण्यात आले व राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या संकेतस्थळाचा शुभारंभ करण्यात आला.

साधारणपणे २०० पेक्षा अधिक दिवस चाललेल्या अभियानातून अनेक महत्वाच्या बाबींवर विशेष लक्ष देऊन नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून ते पूर्ण करता आले. अभियानातून अनेक नवनवीन बाबींची यानिमित्ताने सुरूवात झाली आहे.

अभियान समाप्तीनंतर अभियानामध्ये उत्कृष्ट कामे केलेल्या लाभार्थ्यांना, ग्रामपंचायत, तालुका, जिल्हा व विभाग स्तरावरील अधिकारी कर्मचारी यांचा विविध स्तरावर यथोचित सन्मान करण्यात येणार आहे. यासाठी शासनाने दिनांक १० जून २०२१ रोजीच्या शासन निर्णयामध्ये पुरस्कार नामांकनाचे वेळापत्रक दिले आहे. त्यानुसार विविध स्तरावरील यंत्रणांनी विशेष लक्ष देऊन वेळापत्रकानुसार नामांकने अंतिम करून विविध स्तरावर कार्यक्रमांचे सक्रीय सहभागाने आयोजन करावयाचे आहे. जिल्हा व विभाग स्तरावरील प्राप्त माहितीच्या आधारे राज्यस्तरावरील नामांकने अंतिम करण्यात येणार असून त्यानंतर माहे सप्टेंबर २०२१ मध्ये राज्यस्तरीय कार्यक्रमाचे नियोजन आहे.

महा आवास अभियानामुळे योजनांच्या अंमलबजावणीमध्ये गतिमानता व गुणवत्ता आली आहे. ही गतिमानता पुढील टप्प्यामध्ये कायम राखण्यासाठी अंमलबजावणीच्या टप्प्यांचे सुक्ष्म नियोजन व सनियंत्रण करण्यासाठी विविध पातळीवरील तंत्रे व साधने (Tools and Techniques) यांची पडताळणी करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून अंमलबजावणीमध्ये महत्वाचा घटक असलेल्या ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांचे प्रशिक्षण जागतिक दर्जाच्या IIT, मुंबई या संस्थेमार्फत करण्यात येत असून आतापर्यंत **१२०** पेक्षा अधिक अभियंत्यांचे प्रशिक्षण पार पडले आहे. प्रशिक्षणातून बांधकामाची विविध तंत्रे व कौशल्य अवगत करून दिलेली आहेत. या प्रशिक्षणामध्ये Vernacular buildings in rural area, Sensible housing for rural area, Trends in monitoring and evaluation of rural projects, Construction technologies for affordable housing in the rural area, Design of seismic resistant masonry structures in the rural area, Design of seismic resistant reinforced concrete structures, Multi-hazard resistant housing system in the rural areas, Principles of Foundation Engineering for rural housing, Construction materials (Stones, Bricks/ blocks, tiles, steel), Construction materials (Cement mortar/plaster, Cement Concrete), Construction planning and scheduling, Construction planning and scheduling, Organisation of site and procurement, Quality & Safety in construction, Ten Golden Rules for Quality Management of Concrete Materials & Concrete Construction, Estimation and costing, Building services:

Plumbing Engineering, Rural water supply and sanitation, Off grid Solar Solutions, Condition assessment and rehabilitation of the constructed facilities इ. विषयांची सखोल माहिती प्रशिक्षणार्थींना देण्यात आली. प्रशिक्षित ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्या माध्यमातून राज्यातील सर्व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात येत आहे.

आजही ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या अंमलबजावणीमध्ये काही समस्यांना सामोरे जावे लागत आहे. जसे की, मंजूरी दिल्यानंतर पहिला हप्ता वितरीत करण्यासाठी राज्याचा सरासरी कालावधी ३८ दिवसांचा आहे. पहिल्या हप्त्यानंतर घरकुल पूर्ण करण्याचा सरासरी कालावधी ३१९ दिवसांचा आहे. तसेच पहिला हप्ता वितरीत करून १२ महिन्यापेक्षा अधिक कालावधी झालेली ७५ हजारपेक्षा अधिक घरकुले प्रलंबित आहेत. यावर मात करण्यासाठी लाभार्थी स्तरावरील अडचणी, आवास सॉफ्टच्या अडचणी व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता/ तालुकास्तरावरील अडचणी सोडविण्याचे सुक्ष्म नियोजन करावे लागणार आहे. यातून घरकुले पूर्ण करण्याचा कालावधी १०० दिवसांवर आणण्याचे लक्ष्य व प्रलंबित घरकुले शुन्य करण्याचे नियोजन पुढील काळात असणार आहे. यासाठी सर्व स्तरावरील भागधारकांचा सक्रिय सहभाग यामध्ये अपेक्षित आहे.

अभियानातून तयार करण्यात आलेल्या घरकुल मार्ट शाश्वत होण्यासाठी याचा उपयोग गुणवत्तापूर्ण साहित्याच्या माध्यमातून करणे आवश्यक आहे. तालुका स्तरावरील डेमो हाऊस बरोबरच जिल्हा स्तरावर एक विशेष डेमो हाऊसची निर्मिती करण्याचे नियोजन असून स्थानिक भौगोलिक परिस्थितीनुसार स्थानिक साहित्याच्या आधारे आदर्श डेमो हाऊस उभारण्यात येणार आहेत. महा आवास वेबसाईटचा वापर सर्व स्तरातील भागधारकांना होण्यासाठी वेबसाईट अधिक सुलभ करण्यात येत आहे. या वेबसाईटवर मान्यवरांची माहिती, राज्य व्यवस्थापन कक्षाची माहिती, संरचना, राज्यात राबविण्यात येणा-या विविध ग्रामीण आवास योजनांची माहिती, मार्गदर्शक सूचना, शासन निर्णय, डेमो हाऊसेस, महा आवास अभियान ग्रामीण विषयी माहिती, योजनांचे अहवाल, फोटो गॅलरी, व्हिडिओ गॅलरी, मिडीया गॅलरी, महा आवास त्रैमासिक अंक, सोशल मिडीया व माहिती, शिक्षण व संवाद साहित्य इ. माहिती सर्वांसाठी उपलब्ध आहे.

दरम्यानच्या काळामध्ये राज्यातील ६६ हजार पेक्षा अधिक लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देणेसाठी शासनाच्या विविध विभागांबरोबर चर्चा करण्यात आली असून त्यामधून सकारात्मक प्रतिसाद मिळत असून तसा कॅबिनेट प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

केंद्र शासनाने सन २०२१-२२ साठी राज्यास ३.९१ लाख घरकुलांचे उद्दिष्ट दिलेले असून आवास प्लस 'ड' यादीतील लाभार्थ्यांना यातून लाभ मिळणार आहे. असे असले तरी जोपर्यंत आधार व जॉबकार्ड मॅपींगचे काम १०० टक्के पुर्ण होत नाही तोपर्यंत या लाभार्थ्यांना आवास सॉफ्टवेअर मंजूरीची प्रक्रिया करता येणार नाही. जून अखेर आवास प्लस मधील जॉब कार्ड मॅपींगचे काम ५० टक्केच पुर्ण झाले असून जिल्हा व तालुका स्तरावरील यंत्रणांनी सुक्ष्म नियोजन करून हे काम ३१ जुलै, २०२१ पर्यंत पुर्ण करावयाचे आहे.

सदर अंकामध्ये दिनांक १५ जून २०२१ रोजीच्या ई-गृहप्रवेश व अभियान समाप्तीच्या कार्यक्रमाचा सविस्तर वृत्तांकन करण्यात आलेले आहे. मा. मंत्री, ग्राम विकास, मा. अतिरीक्त मुख्य सचिव ग्राम विकास व पंचायत राज विभाग, राज्य व्यसथापन कक्ष, विभागस्तर, जिल्हास्तर, तालुकास्तर यांच्या पातळीवरील विविध आढावा बैठकांचे सविस्तर वृत्तांकन सदर अकांमध्ये करण्यात आले आहे. याबरोबरच चंद्रपूर, हिंगोली येथील लाभार्थ्यांच्या यशोगाथा, जळगाव मधील ई गृहप्रवेश, कोल्हापूर मधील पर्यावरण पुरक डेमो हाऊस, शबरी आवास योजना यशोगाथा व विविध वृत्तपत्रातील महा आवास अभियानाच्या बातम्यांचा मागोवा घेण्यात आला आहे. हा अंक आपणास आवडेल याची खात्री आहे.

अनेक शुभेच्छांसह!

**डॉ. राजाराम दिघे**
**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण**

# महा आवास अभियान-ग्रामीण ई-गृहप्रवेश कार्यक्रम

**"घर म्हणजे केवळ घर नसतं, असल्या जरी चार भिंती, तरी जगण्यासाठी विणलेलं सुंदर स्वप्न असतं"** ग्रामीण जनतेचे हेच स्वप्न पूर्ण करण्यासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालयाने राज्यात दि. २० नोव्हेंबर २०२० ते ०५ जून २०२१ या कालावधीत महा आवास अभियान - ग्रामीण राबवून अभियान कालावधीत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण आवास योजनांतर्गत लाखो लाभार्थ्यांचे स्वतःच्या घरकुलाचे स्वप्न पूर्ण झाले. अभियान कालावधीत घरकुल पूर्ण करणाऱ्या लाभार्थ्यांच्या गृहप्रवेशासाठी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शुभहस्ते व मा. मंत्री, ग्राम विकास, श्री.हसन मुश्रीफ, मा. मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, श्री. धनंजय मुंडे, मा. राज्यमंत्री, ग्राम विकास व महसूल, श्री. अब्दुल सत्तार, मा. मुख्यमंत्री यांचे अतिरिक्त मुख्य सचिव, श्री. आशिषकुमार सिंह, मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार, मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, श्री. विकास खारगे, मा. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. श्याम तागडे, मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, श्री. आबासाहेब जऱ्हाड, संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत दि. १५ जून २०२१ रोजी सायंकाळी ४.३० वाजता सह्याद्री अतिथी गृह, मलबार हिल, मुंबई येथे **"ई-गृहप्रवेश कार्यक्रम"** संपन्न झाला.

या ई-गृहप्रवेश कार्यक्रमाकरीता सर्व विभागीय आयुक्त, उप आयुक्त (विकास), जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयातील अधिकारी/ कर्मचारी व मिडिया प्रतिनिधी इ. उपस्थित होते. सदरचा कार्यक्रम फिजिकल डिस्टन्सींगचे नियम पाळून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून आयोजित करण्यात आला होता. तसेच सदर कार्यक्रमाचे प्रसारण NIC Web Cast व Facebook Live याव्दारे केल्यामुळे या कार्यक्रमाला पंचायत समिती सभापती/ सदस्य, गट विकास अधिकारी (पंचायत समिती), ग्रामपंचायत सरपंच/ सदस्य, ग्रामसेवक, लाभार्थी, जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामस्तरीय यंत्रणेचे पदाधिकारी/अधिकारी सहभागी होते.




ई-गृहप्रवेश कार्यक्रमाच्या सुरूवातीला मा.मुख्यमंत्री व मा.मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांचे स्वागत मा.मंत्री, ग्राम विकास यांनी केले. मा.मंत्री, ग्राम विकास व मा. राज्यमंत्री, ग्राम विकास व महसूल यांचे स्वागत मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांनी केले. मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, मा. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष विभाग, मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव व मा.मुख्यमंत्री यांचे सचिव यांचे स्वागत संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांनी केले.






मान्यवरांच्या स्वागत समारंभा नंतर महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत अभियान कालावधीत घडलेल्या घडामोडींवर आधारीत लघुपट दाखविण्यात आला. तदनंतर संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी सादरीकरण केले. या सादरीकरणामध्ये राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाची भुमिका व जबाबदारी, महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची प्रगती, भागधारकांची क्षमता बांधणी, अभियानाचे संनियंत्रण व मूल्यमापन, अभियान प्रचार, प्रसिध्दी व जनजागृतीसाठी राबविण्यात आलेले माहिती, शिक्षण व सवांद उपक्रम याबाबत सविस्तर माहिती सादर केली. त्याचप्रमाणे २० नोव्हेंबर २०२० ते ५ जून २०२१ या अभियान कालावधीत ५०,११२ भूमीहीन लाभार्थ्यांना घर बांधण्यासाठी जागा, ३,६९,४९५ घरकुलांना मंजूरी देऊन नवीन लाभार्थ्यांचा समावेश, ८,८१५ ग्रामीण गवंड्यांना प्रशिक्षण देण्यात आले तर १३,२९५ ग्रामीण गवंड्यांचे प्रशिक्षण प्रगतीपथावर, लाभार्थ्यांना मार्गदर्शक ठरणारी ३२० डेमो हाऊसेसची उभारणी, बांधकामाचे साहित्य वाजवी दरात उपलब्ध करुन देण्यासाठी ६१२ घरकुल मार्टची सुरुवात, ४२,१८० लाभार्थ्यांना अनुदाना व्यतिरिक्त वित्तीय संस्थांकडून गृहकर्ज, घरकुल बांधण्यासाठी पुरेशी जागा नसल्यास १,२८६ बहुमजली इमारतीची (जी+१ व जी+२) उभारणी, पुरेशी जागा असल्यास ६२५ गृहसंकुलांची उभारणी, १,२२,१०४ मुलभूत नागरी सुविधांनी युक्त आदर्श घरांची निर्मिती, विविध शासकीय योजनांशी कृतीसंगम करून ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून ६,१०,०६,२८० मनुष्यबळ निर्मिती करुन रोजगार, जल जीवन मिशनमधून ८,०६,८९५ घरकुलांना नळाव्दारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, स्वच्छ भारत मिशनमधून ९,३२,१०२ घरकुलांना शौचालयाचा लाभ, प्रधानमंत्री उज्वला योजनेमधून ७,२७,०३१ गॅस जोडणी, सौभाग्य योजनेतून ७,५१,१५० विद्युत जोडणी व राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती मिशन मधून ८,१०,०३१ लाभार्थ्यांना उपजिविकेचे साधन उपलब्ध करुन देण्यात आले असल्याचे डॉ. राजाराम दिघे यांनी सांगितले.




यानंतर अभियान कालावधीत घरकुले पूर्ण करणाऱ्या लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरूपात घराच्या चाव्या मा.मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते व मा.मंत्री, ग्राम विकास, मा.मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, मा.राज्यमंत्री, ग्राम विकास व महसूल, मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, मा.प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आल्या. यामध्ये ग्रामपंचायत जाळे/खैरे आंबिवली, तालुका वाडा, जिल्हा पालघर येथील श्रीमती सोनी संदेश महाले, ग्रामपंचायत वडवली सयणे, तालुका तलासरी, जिल्हा पालघर येथील श्री.अशोक काशीनाथ भगरे, ग्रामपंचायत एकलहरे, तालुका मुरबाड, जिल्हा ठाणे येथील श्री. पांडू गणपत दरवडा व ग्रामपंचायत चिराड, तालुका मुरबाड, जिल्हा ठाणे येथील श्रीमती रसिका रविंद्र गायकवाड या घरकुल लाभार्थ्यांचा समावेश होता.

याचवेळी विभागस्तरावर विभागीय आयुक्त यांच्या हस्ते व उप आयुक्त (विकास), सहाय्यक आयुक्त (विकास) व इतर सबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या उपस्थितीत घरकुल लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरूपात घराच्या चाव्या प्रदान करण्यात आल्या.





त्याचप्रमाणे जिल्हास्तरावर मा. पालकमंत्री, मा. खासदार, मा. आमदार, मा.अध्यक्ष (जिल्हा परिषद), लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) यांच्या हस्ते व प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) व इतर पदाधिकारी/ अधिकारी यांच्या उपस्थितीत घरकुल लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरूपात घराच्या चाव्या प्रदान करण्यात आल्या.

तालुकास्तरावर मा. आमदार, पंचायत समिती सभापती/ सदस्य, गट विकास अधिकारी (पंचायत समिती) व इतर पदाधिकारी/ अधिकारी यांच्या उपस्थितीत घरकुल लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरूपात घराच्या चाव्या प्रदान करण्यात आल्या.

ग्रामस्तरावर ग्रामपंचायत सरपंच/ सदस्य, ग्रामसेवक व इतर पदाधिकारी/ अधिकारी यांच्या उपस्थितीत घरकुल लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरूपात घराच्या चाव्या प्रदान करण्यात आल्या. यावेळी जळगाव जिल्ह्यातील मोहाडी ग्रामपंचायतीमधील अशाच एका लाभार्थ्यांच्या गृहप्रवेशाचे थेट प्रक्षेपण ई-गृहप्रवेश कार्यक्रमा प्रसंगी दाखविण्यात आले.

पंचायत समिती भोर येथे मा. खासदार, श्रीमती सुप्रिया सुळे यांच्या हस्ते व मा. उपाध्यक्ष, जिल्हा परिषद, पुणे श्री. रणजीत शिवतरे, प्रांत अधिकारी श्री. राजेंद्रकुमार जाधव, तहसीलदार श्री. अजित पाटील, गटविकास अधिकारी श्री. विशाल तनपुरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण सन २०२०-२१ च्या ग्रामपंचायत आंबवडे येथील लाभार्थी श्री. गुलाब मारुती जेधे व ग्रामपंचायत आपटी येथील लाभार्थी श्री. राजू तुकाराम पारते यांना प्रातिनिधीक स्वरूपात घराच्या चाव्या प्रदान करण्यात आल्या.



जिल्हा परिषद, नांदेड़ अंतर्गत देगलुर तालुक्यामधील खानापुर येथे मा. मंत्री, सार्वजनिक बांधकाम तथा पालकमंत्री, नांदेड श्री. अशोकराव चव्हाण यांचे हस्ते नमूना नंबर ८ व प्रातिनिधीक स्वरूपात घराच्या चाव्या प्रदान करण्यात आल्या. यावेळी मा. अध्यक्षा, जिल्हा परिषद, नांदेड, श्रीमती मंगाराणी अंबुलगेकर, मा. आमदार, श्री. मोहन हंबर्डे यांची प्रमुख उपस्थिती होती.



खामगाव तालुक्यात अभियान कालावधीत घरकुलाचे काम पूर्ण झालेल्या ग्रामपंचायत घाटपुरी येथील श्री. कैलाश यादगिरे या लाभार्थ्याच्या घरकुलाचा मा. आमदार, श्री. आकाश फुंडकर यांचे उपस्थितीमध्ये गृहप्रवेश करण्यात आला. या गृहप्रवेश कार्यक्रमाला पंचायत समिती सभापती, श्रीमती रेखाताई युवराज मोरे, पंचायत समिती सदस्या, श्रीमती दुर्गाताई विजय महाले, सरपंच, श्रीमती ढोले, गटविकास अधिकारी, श्री. चंदनसिंग राजपुत, शाखा अभियंता, श्री.कस्तुरे, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, श्री.इंगळे, श्री. वाघ, श्री. संचित तायडे, ग्रामविकास अधिकारी, श्री. माटे, इ. उपस्थित होते.



ई-गृहप्रवेश कार्यक्रमाच्या निमित्ताने महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत अभियान कालावधीत पूर्ण झालेल्या सर्व घरकुलांचे गृहप्रवेश करण्यात आले. याप्रसंगी मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री, ग्राम विकास, मा.मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, व मा.राज्यमंत्री, ग्राम विकास व महसूल यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यानंतर उपसंचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, श्री. नीलेश काळे यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रम संपन्न झाल्याचे जाहीर केले.

## आठ लाख कुटुंबांना घरकुलाचा लाभ देऊन ग्रामविकास विभागाची कौतुकास्पद कामगिरी - मा.ना.श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

ग्रामविकास विभागामार्फत राबविण्यात आलेल्या महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत घरकुलाचा लाभ मिळालेल्या ३ लाख २३ हजार लाभार्थ्यांनी आज गृहप्रवेश केला. त्याचबरोबर या अभियाना अंतर्गत सुमारे ४ लाख ६८ हजार घरकुलांची बांधकामे पुर्णत्वाच्या मार्गावर असून ती महिन्याभरात पूर्ण होतील. अशा पद्धतीने या अभियानातून कमी कालावधीत सुमारे आठ लाख कुटुंबांना घरकुलाचा लाभ देऊन ग्रामविकास विभागाने कौतुकास्पद कामगिरी केली आहे, असे गौरवोद्गार मा. मुख्यमंत्री, श्री.उद्धव ठाकरे यांनी ई-गृहप्रवेश कार्यक्रमा प्रसंगी बोलताना काढले.

योजना अनेक येत असतात, अनेक योजना वाजत-गाजत जाहीर केल्या जातात नंतर गुंडाळून ठेवल्या जातात. मात्र महा आवास अभियान या योजनेत महा आवास नावाला साजेशी कामगिरी केली आहे. स्वतःचे घर असणं हे स्वप्न असतं, परंतु सर्वांचे ते पूर्ण होत नाही. विशेषतः भूमीहीनांसाठी ते कठीण असत, जागाच नाही अशाचेही घरांचे स्वप्न अभियानात पूर्ण केले. या योजनेत इतक्या जलद गतीने काम झाले की इतक्या कमी कालावधीत इतकी घरकुले बांधणारे हे देशातील नाही तर जगातील पहिले राज्य असेल, असेही मा. मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले.

मागील दीड वर्षापासून राज्य कोरोनाच्या संकटाशी लढत असताना आपण नागरिकांना घरात राहा, सुरक्षित राहा असे आवाहन करत होतो. परंतू घर नसलेल्यांनी घरात कसे राहायचे, भुमीहीनांनी घरात सुरक्षित कसे राहायचे हा मोठा प्रश्न होता, याचे उत्तर ग्रामविकास विभागाने दिले असून अभियान कालावधीत ८ लाख घरे बांधण्याचे उद्दिष्ट विभागाने निश्चित केले होते. त्यातील ३ लाख २२ हजारांहून अधिक घरकुले बांधून पूर्ण झाली याच्या चाव्या आज आपण लाभार्थ्यांना देत आहोत, तर उर्वरित ४ लाख ६७ हजार ९५३ घरांचे काम एक महिन्यात पूर्ण होणार आहे. ग्रामविकास विभागाने जलदगतीने घरे बांधून गोरगरीबांना त्यांचे हक्काचे घर मिळवून दिले आहे. त्याबद्दल मी यंत्रणेत काम करणाऱ्या सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करतो. ३ लाख २२ हजार ९२९ घरकुलात राहणाऱ्या सदस्यांची संख्या लक्षात घेतली तर आज १५ लाख लोकांच्या डोक्यावर महा आवास अभियानातील घरकुलांनी छत उपलब्ध करून दिले आहे, त्यांना सुरक्षित केले आहे, असे मा. मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

मा. मुख्यमंत्री म्हणाले की, अभियानात राबविण्यात आलेला ग्रामीण गवंडी प्रशिक्षणाचा हा उपक्रम कौतुकास्पद आहे. घरांच्या बांधणीसाठी लागणारे साहित्य महिला बचतगटांच्या **"घरकुल मार्ट"** मधून उपलब्ध करून देऊन घरकुल तर दिलचं, पण घरामध्ये रोजगार उपलब्ध करून देण्याचे कामही केले आहे. यामुळे सर्वसामान्य जनतेचे स्वप्न खऱ्या अर्थाने पूर्ण झाले असल्याचे मा. मुख्यमंत्री म्हणाले. महा आवास अभियानातून हक्काचे घर मिळालेल्या लाभार्थ्यांनी घराला, स्वत:च्या कुटुंबाला कोरोनामुक्त ठेवण्याचे वचन मला द्यावे, कारण यातूनच गाव आणि राज्याचा कोरानामुक्तीचा प्रवास यशस्वी होणार आहे, असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी यावेळी सांगितले.



## महाराष्ट्र शासनाकडून ग्रामीण गृहनिर्माण योजनांकरीता भरीव निधीची उपलब्धता - मा.ना.श्री. अजित पवार, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



मा. उपमुख्यमंत्री, श्री. अजित पवार हे दि.१५ जून २०२१ रोजी झालेल्या ई-गृहप्रवेश कार्यक्रमाकरीता प्रत्यक्षात उपस्थित नव्हते, परंतु त्यांनी त्यांच्या संदेशाव्दारे या कार्यक्रमाबाबत आपले मनोगत व्यक्त केले आहे.

राज्यात दिनांक २० नोव्हेंबर २०२० ते ०५ जून २०२१ या कालावधीत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना अधिक गतिमान करण्यासाठी व त्यात गुणवत्ता आणण्यासाठी **"महा आवास अभियान-ग्रामीण"** राबविणेबाबत शासनाने निर्णय घेतला होता, हे अभियान यशस्वी झाले असून या अभियानात लाखो लोकांना स्वतःचे पक्के घर मिळाले असल्याचे मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी संदेशात नमुद केले आहे.

या अभियानाच्या यशस्वीतेसाठी शासकीय यंत्रणेबरोबर समाजातील सर्व घटक जसे- स्वयंसेवी संस्था, सहकारी संस्था, खासगी संस्था (Corporates), तंत्र शिक्षण संस्था, पंचायतराज संस्था, बँका, लोकप्रतिनिधी, लाभार्थी, लोक इत्यादींनी मोठ्या प्रमाणात सक्रिय सहभाग दर्शविला. तसेच याकामी सर्व जिल्हा परीषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत पदाधिकारी व सदस्य यांच्या सक्रिय सहभागाबरोबर ग्राम विकास विभागाची क्षेत्रीय यंत्रणा आघाडीवर राहीली. त्यांच्या यशाबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. असे मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी संदेशाव्दारे सांगितले.

महाराष्ट्र शासनाने या ग्रामीण गृहनिर्माण योजनांकरीता केंद्र व राज्याच्या माध्यमातून आतापर्यंत भरीव निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. **"ई-गृहप्रवेश"** च्या माध्यमातून आज सर्व मुलभूत सुविधांनी युक्त अशा स्वत:च्या मालकीच्या घरकुलात प्रवेश करणाऱ्या सर्व ग्रामीण गृहनिर्माण लाभार्थ्यांचे अभिनंदन मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी संदेशाव्दारे केले.

## राज्यातील ग्रामीण भागात स्वतःचे घर नाही, असे एकही कुटुंब भविष्यात राहणार नाही
## - मा.ना.श्री. हसन मुश्रीफ, मंत्री, ग्राम विकास

महा आवास अभियान-ग्रामीण मध्ये आज गृहप्रवेश केलेली ३ लाख २३ हजार कुटुंबे आणि बांधकाम पुर्णत्वाच्या मार्गावर असलेली ४ लाख ६८ हजार कुटुंबे अशा एकुण ८ लाख कुटुंबांची सरासरी सदस्य संख्या लक्षात घेतली तर सुमारे ४० लाख लोकांना पावसाळ्यापूर्वी घरकुलाचे छत मिळाले आहे. कोरोनाचे संकट असतानाही सर्व यंत्रणेने एकजुटीने हे अभियान यशस्वी केले. असे अभियान कदाचित देशात कुठेही राबविले नसेल, असे मा. मंत्री, ग्राम विकास, श्री.हसन मुश्रीफ म्हणाले.

कोरोना संकटामुळे सर्व अधिकारी कोरोना संसर्ग रोखण्याच्या कामात व्यस्त असतांनाही गरिबांच्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी पुढाकार घेवून अभियान यशस्वी केले याचा मला व माझ्या विभागाला खुप आनंद झाला असल्याचे मा. मंत्री महोदयांनी सांगितले. अभियान कालावधीत भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यात आली. गवंडी प्रशिक्षण, घरकुल मार्ट, बहुमजली इमारती, गृहसंकुले यासारखे वेगवेगळे प्रयोग करुन घरांचा दर्जा चांगला राहील यासाठी दक्षता घेण्यात आली. वाळूची वेळेत उपलब्धता आणि स्टीलचे वाढलेले दर असतांनाही लाभार्थ्यांनी दिलेले सहकार्य व घरकुल बांधकामासाठी त्यांनी घेतलेले स्वकष्ट यामुळेच इतक्या मोठ्या प्रमाणात घरकुलांचे बांधकाम पूर्ण केल्याबद्दल लाभार्थ्यांचे मा. मंत्री महोदयांनी आभार मानले.

आता चालू वर्षात प्रतिक्षा यादीतील लाभार्थ्यांनाही घरे देण्यात येतील. राज्यात ग्रामीण भागात स्वत:चे घर नाही असे एकही कुटुंब बाकी राहू देणार नाही, यासाठी यापुढे काम करण्यात येणार असल्याचे मा. मंत्री, ग्राम विकास, श्री. हसन मुश्रीफ यांनी सांगितले.



## अभियानामुळे रमाई आवास योजनेच्या हजारो लाभार्थ्यांना मिळाला हक्काचा निवारा
## - मा.ना.श्री. धनंजय मुंडे, मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य

महा आवास अभियानामुळे अनुसुचित जमाती व नवबौद्ध घटकांच्या लोकांना मोठ्या प्रमाणात फायदा झाला आहे. या अभियानासाठी लागणारा निधी सामाजिक न्याय विभागाने उपलब्ध करून दिला असून त्यासोबत गेल्या दोन वर्षाची थकबाकीही पूर्ण करून दिली. तसेच केवळ घरकुल देवून मोकळे होणे हा उद्देश नसून अनुसुचित जाती व नववौद्ध घटकांचे Satellite Mapping करण्याचा कार्यक्रम हाती घेतला असून सामाजिक सुरक्षा, स्थैर्य प्रदान करून समाजाचा सामाजिक स्तर उंचावण्याबाबत प्रयत्न करणार असल्याचे मा.मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, श्री.धनंजय मुंडे यांनी सांगितले.

ग्रामीण भागातील रमाई आवास योजनेच्या हजारो लोकांना या अभियानाचा फायदा झाला आहे. एकीकडे कोरोना संकटाशी लढाई व दुसरीकडे या अभियानाचे यश अशा या कठीण प्रसंगात देखील सर्वांना अभिमान वाटावा अशी कामगिरी केल्यामुळे आज हजारो-लाखो लोकांचे घराचे स्वप्न पूर्ण होत

असून आपण हा गृहप्रवेशाचा नेत्रदीपक सोहळा पाहत आहोत, असे मा. मंत्री महोदय म्हणाले.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मा. मंत्री, श्री. धनंजय मुंडे म्हणाले की, ग्राम विकास विभागाने विविध विभागांच्या सहयोगातून महा आवास अभियान अत्यंत प्रभावीपणे राबविले. अनुसुचित जाती, जमाती यांनाही सामाजिक न्याय, आदिवासी विकास यांच्या योजनेतील घरकुलांचा लाभ देण्यात आला. त्यामुळे वंचित घटकांचा सामाजिक स्तर उंचावण्यात या अभियानाचा मोठा फायदा झाला. यापुढील काळातही सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसुचित जातीतील लाभार्थ्यांसाठी घरकुल योजनांकरीता भरीव निधी उपलब्ध करुन दिला जाईल, असे त्यांनी सांगितले. तसेच अभियान कालावधीत उत्कृष्ट काम करणाऱ्यांना गौरविण्यात येणार आहे. स्वतःच्या पक्क्या घराचे स्वप्न पूर्ण करून गृहप्रवेश करणाऱ्या सर्व लाभार्थ्यांचे अभिनंदन व पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा मा. मंत्री महोदयांनी दिल्या.



## कोरोना संकटाच्या काळात महाआवास अभियानात अभूतपुर्व कामगिरी
## - मा.ना.श्री. अब्दुल सत्तार, राज्यमंत्री, ग्राम विकास व महसूल

श्रीमंता प्रमाणेच गोर, गरीब, दीनदुबळ्या ग्रामीण भागातील लोकांनाही चांगले घर मिळावे, त्यांच्या मुलांना चांगले शिक्षण मिळावे व त्यांचे जीवनमान उंचावणे या उद्देशाने महा आवास अभियान राज्यात राबविण्यात आले. कोरोना महामारीच्या संकटावर मात करून सर्वांनी अभियान काळात उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे आज ३ लाख २२ हजार लाभार्थ्यांनी गृहप्रवेश केला आहे. हे कदाचित देश स्वतंत्र झाल्यापासून पहिल्यांदाच इतके घरकुल बांधकाम झाले असेल, ते पण संकट काळात घडले असे मा. राज्यमंत्री, ग्राम विकास व महसूल, श्री. अब्दुल सत्तार यांनी सांगितले.

महा आवास यशस्वीतेसाठी महसूल विभागाने मोलाचे सहकार्य केले आहे. घर बांधकामासाठी एकवेळ श्रीमंत माणसाला वाळू मिळाली नाही; पण गरिबांना वाळू दिली. लाभार्थ्यांना वाजवी दरात घरकुल बांधकाम साहित्य उपलब्धतेसाठी घरकुल मार्ट सुरू केले. भूमीहीन लाभार्थ्यांना जागेची उपलब्धता करून दिली. बहुमजली इमारती, गृहसंकुले उभारण्यात आली. या अभियानामुळे लाखो गरिबांना हक्काचा निवारा मिळाला आहे. असे मा. राज्यमंत्री महोदय म्हणाले.

कोरोना संकटाच्या काळात ग्राम विकास यंत्रणेने महा आवास अभियानाद्वारे केलेली कामगिरी अभूतपुर्व अशी आहे. या योजनेद्वारे गोरगरीब, वंचित घटकांना त्यांच्या हक्काचा निवारा मिळाला. अभियान काळात उद्दीष्ट निश्चित केलेले सुमारे ८ लाख घरकुलांपैकी आज ३ लाख २३ हजार जणांचा गृहप्रवेश झाला आहे. उर्वरीत लाभार्थीही महिन्याभरात गृहप्रवेश करतील. सामान्य लोकांचे घराचे स्वप्न पूर्ण करण्यामध्ये या अभियानाने महत्वपूर्ण योगदान दिले असल्याचे मा. राज्यमंत्री, ग्राम विकास व महसूल, श्री.अब्दुल सत्तार म्हणाले.



## अभियानाच्या यशस्वीतेसाठी सर्व शासकीय यंत्रणेचा सक्रीय सहभाग
## - मा.श्री. सिताराम कुंटे, भा.प्र.से., मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन



मा. मुख्य सचिव, श्री. सिताराम कुंटे हे दि.१५ जून २०२१ रोजी झालेल्या ई-गृहप्रवेश कार्यक्रमाकरीता प्रत्यक्षात उपस्थित नव्हते; परंतु त्यांनी त्यांच्या संदेशाव्दारे या कार्यक्रमाबाबत आपले मनोगत व्यक्त केले आहे.

**"सर्वांसाठी घरे - २०२२"** हे केंद्र शासनाचे महत्वाचे धोरण असून राज्यशासनाने देखील या धोरणाचा स्विकार केला आहे. या अनुषंगाने राज्यात केंद्र व राज्य पुरस्कृत योजना अभियान स्वरुपात राबविण्यात येत आहेत. राज्यात ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात सुरु असलेल्या कामास अधिक गती देण्यासाठी, त्यातील गुणवत्तावाढीसाठी

दिनांक २० नोव्हेंबर २०२० ते ०५ जून २०२१ या कालावधीत राबविण्यात आलेल्या **"महा आवास अभियान-ग्रामीण"** च्या दैदिप्यमान यशाबद्दल मला आनंद वाटतो. असे मा. मुख्य सचिव, श्री.सिताराम कुंटे यांनी आपल्या संदेशात नमुद केले आहे.

अभियान कालावधीत सर्व भागधारकांची क्षमता बांधणी व माहिती, शिक्षण व संवाद या उपक्रमांवर भर देऊन अभियानाची उद्दिष्टे साध्य करण्यात आली. उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था/ व्यक्तींना पुरस्कार देवून त्यांना प्रोत्साहित करण्यात येणार असल्याने ग्रामीण गृहनिर्माण योजनांची अधिक प्रगती होईल असे मा. मुख्य सचिवांनी आपल्या संदेशाव्दारे सांगितले.

केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत या गृहनिर्माण योजनांशी संबंधीत विभागांचे सचिव, राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व संबंधित सर्व शासकीय यंत्रणा या अभियानात सक्रीय सहभागी होऊन हे अभियान यशस्वी केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन मा. मुख्य सचिवांनी आपल्या संदेशात व्यक्त केले. त्याचप्रमाणे या प्रसंगी ई-गृहप्रवेशाव्दारे गृहप्रवेश करणाऱ्या सर्व लाभार्थ्यांचे अभिनंदन मा. मुख्य सचिवांनी आपल्या संदेशाव्दारे केले आहे.

## विविध शासकीय योजनांच्या कृतीसंगमातून घरकुल लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावले
### - मा.श्री. राजेश कुमार, भा.प्र.से., अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग

**"सर्वांसाठी घरे - २०२२"** या शासकीय धोरणानुसार राज्यामध्ये ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात काम सुरु आहे. संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत ध्येये (Sustainable Development Goals) मधील धोरण क्रमांक ११ नुसार किफायतशीर गृहनिर्माण (Affordable Housing) क्षेत्रात काम झाल्यास एकूण १७ SDG पैकी किमान १४ SDG वर सकारात्मक प्रभाव पडणार आहे. यासाठी घरकुलांच्या कामाची प्रगती फक्त संख्यात्मक न राहता गुणात्मक रहावी, नाविन्यपूर्ण कल्पना अंमलात आणून लाभार्थ्यांना सर्व सुविधांनी युक्त असे घरकुल उपलब्ध करुन द्यावे, तसेच नैसर्गिक आपत्तीस सक्षमपणे सामोरे जाणारे घरकुल बांधण्यासाठी पुढाकार घ्यावा असे शासनाचे ध्येय असल्याचे मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार यांनी सांगितले.

त्या पार्श्वभूमीवर 'राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण' कार्यालयामार्फत **"महा आवास अभियान-ग्रामीण"** चे माध्यमातून भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधणीसाठी जागा उपलब्ध करुन देणे, वाळूसहीत इतर बांधकाम साहित्यांची उपलब्धता, बहुमजली इमारती, गृहनिर्माण वसाहती, डेमो हाऊसेस, विभागीय भौगोलिक परिस्थितीनुसार घरांची रचना, नैसर्गिक आपत्तीरोधक घरे, नवनवीन तंत्रज्ञान, इत्यादी बाबींवर यशस्वीपणे लक्ष देण्यात आले असल्याचे मा.अतिरिक्त मुख्य सचिव म्हणाले.

तसेच शासनाच्या इतर योजना जसे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण, जल जीवन मिशन, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, उजाला योजना, सौभाग्य योजना, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान, इत्यादींशी कृतीसंगम करुन घरकुलांच्या लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यात आले असल्याचे मा. अतिरिक्त मुख्य सचिवांनी सांगितले.

यासाठी सर्व उपायुक्त (विकास), मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), गट विकास अधिकारी इ. सर्व ग्राम विकास यंत्रणेचा सक्रिय पुढाकार राहीला. उत्कृष्ट कामासाठी पुरस्कार सुध्दा देण्यात येणार असल्याने त्यांच्या कामाची दखल घेतली जाणार आहे. तसेच याप्रसंगी "ई-गृहप्रवेश" च्या माध्यमातून सर्व सुविधांनीयुक्त अश्या स्वत:च्या मालकीच्या घरात प्रवेशाकरीता सर्व लाभार्थ्यांचे मन:पुर्वक अभिनंदन मा.अतिरिक्त मुख्य सचिवांनी केले.






## अभियानाचे यश व लाभार्थ्यांना पावसाळ्यापूर्वी गृहप्रवेश यासाठी मुदतवाढीची घोषणा - मा.ना.श्री. हसन मुश्रीफ, मंत्री, ग्राम विकास



राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) व विविध राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनांची अंमलबजावणी गतिमान करण्यासाठी व त्यामध्ये गुणवत्ता आणण्यासाठी राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून दिनांक २० नोव्हेंबर २०२० पासून महाआवास अभियान-ग्रामीण राबविण्यात येत आहे. या अभियानाला राज्यात मिळालेले यश पहाता प्रथम १ मे २०२१ व त्यानंतर लाभार्थ्यांना पावसाळ्यापूर्वी गृहप्रवेश करण्यासाठी ०५ जून २०२१ पर्यंत मुदतवाढीच्या घोषणा मा. मंत्री, ग्राम विकास, श्री. हसन मुश्रीफ यांनी केली.

राज्यात महा आवास अभियान-ग्रामीणला भरघोस यश मिळाले असून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण आवास योजनांमधून अभियान कालावधीत राज्यात मोठ्या प्रमाणात घरकुलांचे बांधकाम करण्यात आले असून प्रगतीपथावर असलेल्या घरकुलांचे बांधकाम चालू महिन्याअखेर पूर्ण करण्यात येईल. तसेच ग्रामीण भागात अभियानाला मिळालेले यश पाहता अभियानास १ मे २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत असल्याचे मा.मंत्री महोदयांनी जाहीर केले होते. त्यानंतर राज्यातील पात्र लाभार्थ्यांना पावसाळ्यापूर्वी गृहप्रवेश करता यावा तसेच घरकुलासोबतच शासनाच्या इतर योजनांचा लाभ देऊन त्यांचे जीवनमान उंचावावे व उर्वरित घरकुलांचे काम गुणवत्तापूर्ण आणि जलदगतीने पूर्ण करण्यात यावे यासाठी ५ जून २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत असल्याचे मा.मंत्री महोदयांनी सांगितले.

मा. मंत्री, ग्राम विकास, श्री. हसन मुश्रीफ म्हणाले की, प्रगतीपथावर असलेले घरकुलेही येत्या कालावधीत पूर्ण होतील. अभियान कालावधीत वेळेत दर्जेदार घरकुले पुर्ण व्हावी व बांधकामासाठी गवंड्यांची कमतरता भासू नये यासाठी गवंडी प्रशिक्षणही राबविण्यात येत आहे. घरकुल बांधणीबरोबरच लाभार्थ्यांना इतर शासकीय योजनांचा लाभ मिळवून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी घरकुल योजनांचा इतर शासकीय योजनांशी कृतीसंगम करण्यात येत आहे. अशी माहिती मा.मंत्री, श्री. मुश्रीफ यांनी दिली.

अभियानामध्ये नावीन्यपूर्ण उपक्रमांचाही समावेश करण्यात आला असून यामध्ये पुरेशी जागा नसलेल्या लाभार्थ्यांसाठी बहुमजली इमारतीची उभारणी, जेथे पुरेशी जागा उपलब्ध आहे अशा ठिकाणी सर्व सोयीसुविधांनी युक्त गृहसंकुलांची उभारणी, लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाचे साहित्य वाजवी दरात एकाच छताखाली उपलब्ध होण्यासाठी घरकुल मार्टची सुरूवात, लाभार्थ्यांना अधिक सोयीसुविधायुक्त घरकुल बांधकामासाठी बँकेचे ७० हजार रुपये गृहकर्ज उपलब्धता, मुलभूत सुविधांद्वारे आदर्श घरकुलांची निर्मिती अभियान कालावधीत करण्यात आली असून येत्या कालावधीत महा आवास अभियान-ग्रामीण मिशन मोडवर राबवून ग्रामीण भागातील सर्व बेघरांना आदर्श पद्धतीची घरकुले जलद गतीने उपलब्ध करुन देण्यात येतील. यासाठी अभियानात सर्व लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थांनी सक्रीय सहभाग घेऊन अभियान यशस्वी करण्याचे आवाहन मा.मंत्री, ग्राम विकास, श्री. हसन मुश्रीफ यांनी केले.

## गुणवत्तापूर्ण घरकुल निर्मितीसाठी आय.आय.टी. मुंबई मार्फत १२०० ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांना क्षमता बांधणी प्रशिक्षण - मा. ना. श्री. हसन मुश्रीफ, मंत्री ग्राम विकास

भारतीय प्रौद्योगिकी संस्थान, मुंबई (IIT Bombay) आणि राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण यांचेमधील पार्टनरशिपची उद्घोषणा मा.मंत्री, ग्राम विकास, श्री. हसन मुश्रीफ यांनी दि.२३.०२.२०२१ रोजी केली. या पार्टनरशिपच्या माध्यमातून राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण अभियंते यांची क्षमता बांधणीसाठी प्रशिक्षण देण्याचा उपक्रम ग्राम विकास विभाग राबवित असल्याचे मा.मंत्री, ग्राम विकास, श्री. हसन मुश्रीफ यांनी सांगितले.


भारतीय प्रौद्योगिकी संस्थान, मुंबई (IIT Bombay) यांच्या माध्यमातून राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातून ३ याप्रमाणे १०२ अभियंत्यांसाठी तीन टप्प्यात प्रशिक्षण आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आले होते. त्यातील पहिली बॅच दि. ३ ते ७ मे

२०२१, दुसरी बॅच ७ ते ११ जून २०२१ या बॅचचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून दि. ५ ते ९ जूलै २०२१ या कालावधीत तीसऱ्या बॅचचे प्रशिक्षण नियोजित आहे. या प्रशिक्षणामध्ये भूकंपरोधक घरकुल निर्माण, पर्यावरण पूरक गृहनिर्माण, बांधकाम साहित्यावरील संशोधन, बांधकाम क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, सनियंत्रण आणि मूल्यमापन, पाणी पुरवठा आणि भूमिगत गटारे तसेच स्थानिक भौगोलिक परिस्थिति नुसार घरकुल निर्माण आदि विषयांवर अभियंत्याची प्रशिक्षणाव्दारे क्षमता बांधणी करण्यात आली आहे. ग्रामीण गृहनिर्माण अभियंता राज्यातील घरकुल योजनांसाठी अत्यंत महत्वाचा घटक असून त्यांची क्षमता बांधणी करण्यासाठी हे प्रशिक्षण अत्यंत उपयुक्त आहे. तरी प्रशिक्षणार्थी गेल्या ५ दिवसात शिकलेल्या सर्व गोष्टींच्या आधारे आपल्या जिल्ह्यातील उर्वरीत सर्व अभियंत्याचे प्रशिक्षण आपण काटेकोरपणे घेण्याच्या सूचना मा. मंत्री महोदयांनी प्रशिक्षणार्थींना दिल्या.

त्याचप्रमाणे मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.राजेश कुमार यांनी सांगितले की, ज्या पध्दतीने आपण प्रशिक्षण घेतले त्याच पध्दतीने आपण खालीही प्रशिक्षण द्यावे. तसेच या प्रशिक्षणामध्ये आपण जे शिकलात त्याच्या आधारे लाभार्थ्यांना मार्गदर्शन करावे. आपण आत्मसात केलेल्या विविध तंत्रज्ञानाचा वापर करून ग्रामीण भागातील घरांची गुणवत्ता कशी सुधारेल यावर लक्ष केंद्रीत करावे. अशा सूचना सर्व प्रशिक्षणार्थी अभियंत्यांना मा. अतिरिक्त मुख्य सचिव यांनी दिल्या.

आयआयटी मुंबई सारख्या नामांकित संस्थेमार्फत घेतलेल्या प्रशिक्षणाचा फायदा ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या गुणवत्तावाढीसाठी नक्की होईल असे मत संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी व्यक्त केले.

या ५ दिवसीय प्रशिक्षणाला संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ. राजाराम दिघे सह, राज्य व्यवस्थापन कक्षाचे उपसंचालक, श्री.नीलेश काळे, श्री. संतोष पानसरे, श्री. परमेश्वर शेलार, श्री.दिनेश मोवळे, जिल्हा, तालुकास्तरीय अभियंते व ग्रामीण गृहनिर्माण अभियंते प्रशिक्षणार्थी म्हणून उपस्थित होते. या संपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व नियोजन आय.आय.टी. मुंबई याच्या वतीने प्रा. प्रकाश नाथगोपालन यांनी केले.




## मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांच्या अध्यक्षतेखाली ई-गृहप्रवेश कार्यक्रम व महा आवास अभियान पुरस्कार या विषयी मार्गदर्शनपर बैठक

मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांच्या उपस्थित महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत इ-गृहप्रवेश कार्यक्रम व अभियानात उत्कृष्ट काम करणाऱ्यासाठी पुरस्कार या विषयी मार्गदर्शनासाठी दि. २०.५.२०२१ रोजी बैठक घेण्यात आली. या बैठकीला राज्य व्यवस्थापन कक्षाचे अधिकारी यांच्यासह सर्व उप आयुक्त (विकास), जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) व्हिडीओ कॉन्फरन्सींच्या माध्यमातून उपस्थित होते.

या बैठकीमध्ये महा आवास अभियान ग्रामीण अंतर्गत घरकुले पूर्ण करणाऱ्या लाभार्थ्यासाठी ई-गृहप्रवेश कार्यक्रमाबाबत मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांनी उपस्थितांना आवश्यक सूचना दिल्या.

अभियान कालावधीत उत्कृष्ट काम करणारे व्यक्ती किंवा संस्था यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. त्यानुषंगाने त्या त्या स्तरावर नेमण्यात आलेल्या संनियंत्रण व मूल्यमापन समितीने करावयाच्या गुणांकन पध्दतीबाबत डॉ. राजाराम दिघे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. सदर पुरस्कार नामांकने निवड व पुरस्कार वितरण विहीत मुदतीत करण्याच्या सूचना मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार यांनी दिल्या.



## मा. मंत्री, ग्राम विकास यांनी घेतला महा आवास अभियान-ग्रामीणचा आढावा

मा. मंत्री, ग्राम विकास यांच्या अध्यक्षतेखाली व मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार, संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्या उपस्थितीत दि. ०३ व २९ जून, २०२१ रोजी महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत विविध आवास योजनांचा आढावा घेण्यात आला. या बैठकीला राज्य व्यवस्थापन कक्षाचे अधिकारी यांच्यासह सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक व इतर संबंधित अधिकारी व्हिडीओ कॉन्फरन्सींच्या माध्यमातून उपस्थित होते.

दि. ०३ जून २०२१ रोजी झालेल्या बैठकीमध्ये महा आवास अभियान ग्रामीण अंतर्गत १० उपक्रमांचा जिल्हानिहाय आढावा घेण्यात आला. राज्यात महा आवास अभियान-ग्रामीण यशस्वीपणे राबविण्यात आले असून दि. ०५ जून २०२१ रोजी महा आवास अभियान-ग्रामीण समाप्ती आहे. अभियान कालावधीत घरकुले पूर्ण करणाऱ्या लाभार्थ्यांच्या गृहप्रवेशासाठी ई-गृहप्रवेश कार्यक्रम आयोजित करणार असल्याने त्यानुषंगाने ई-गृहप्रवेश कार्यक्रमाबाबत व त्याबाबतचे नियोजना विषयी आवश्यक सूचना मा.मंत्री, ग्राम विकास श्री.हसन मुश्रीफ यांनी उपस्थितांना दिल्या.

दि. २९ जून, २०२१ रोजी झालेल्या बैठकीमध्ये अभियान कालावधीत विविध आवास योजनांतर्गत झालेल्या कामांचा सविस्तर आढावा घेतला. तसेच ज्या जलद गतीने अभियान कालावधीत घरकुले बांधण्यात आली त्याच गतीने यापुढेही ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात काम करण्याच्या सूचना मा. मंत्री महोदयांनी उपस्थितांना दिल्या.

अभियान कालावधीत उत्कृष्ट काम करणारे व्यक्ती किंवा संस्था यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. त्याकरीता राज्य, विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत या सर्व स्तरावर समित्यांचे गठण करण्यात आले असून या समित्यांनी करावयाच्या गुणांकन पध्दतीबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे. तसेच महा आवास अभियान पुरस्कार देण्याबाबत शासन निर्णय दि. १० जून २०२१ रोजी निर्गमित करण्यात आला असल्याचे संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ. राजाराम दिघे यांनी बैठकीमध्ये उपस्थितांना सांगितले.

सर्व स्तरावरील तपासणी व पुरस्कार वितरण शासन निर्णयात दिलेल्या मुदतीमध्ये करण्याच्या सूचना मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिल्या.



## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचेकडून पुणे, सांगली व सोलापूर जिल्ह्यातील महा आवास अभियानातील कामाची पहाणी

राज्यात महा आवास अभियान-ग्रामीणची प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी राज्य, विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावर बैठका घेतल्या. त्याचप्रमाणे अभियान कालावधीत आवास योजनांच्या कामाना गतिमान करण्यासाठी व भागधारकांच्या क्षमता बांधणीसाठी सर्व स्तरांवर क्षेत्रिय भेटी दिल्या.

दिनांक ५ जून, २०२१ रोजी या अभियानाची समाप्ती झाली असून अभियान कालावधीत मोठ्या प्रमाणात घरकुलांची कामे पूर्ण झाली आहेत. अभियान कालावधीत झालेल्या कामाची पहाणी करण्याकरीता डॉ. राजाराम दिघे यांनी दिनांक २१ ते २३ जून २०२१ या कालावधीत पुणे विभागातील पुणे, सांगली व सोलापूर जिल्ह्यांतील ग्रामपंचायतीचा दौरा केला. या दौरा कार्यक्रमा दरम्यान त्यांनी विविध आवास योजनेतील घरकुलांची पहाणी केली. त्याचप्रमाणे लाभार्थी, ग्रामस्थ व ग्रामसेवक यांना मार्गदर्शन केले.




## महा आवास अभियान-ग्रामीणच्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्या विभागनिहाय आढावा बैठका

राज्यात महा आवास अभियान-ग्रामीणची प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी व अभियान कालावधीत राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेण्यासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांच्या अध्यक्षतेखाली व राज्य व्यवस्थापन कक्षाचे अधिकारी यांच्या उपस्थितीत माहे एप्रिल २०२१ मध्ये दिनांक २०, २२, २३ व माहे मे २०२१ मध्ये २५, २७, २८ रोजी अमरावती, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, पुणे व कोकण विभागांच्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंग व्दारे आढावा बैठका घेण्यात आल्या.

या बैठकांना विभागीय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त (विकास), सहाय्यक आयुक्त (विकास), जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, विभागीय प्रोग्रामर, जिल्हास्तरीय प्रोग्रामर, डाटा एन्ट्री ऑपरेटर व संबंधित अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत विविध आवास योजनांच्या आर्थिक व भौतिक प्रगतीचा व अभियान कालावधीत राबवित असलेल्या १० उपक्रमांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. अभियान कालावधीत भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देणे. घरकुलांच्या उद्दिष्टांप्रमाणे १०० टक्के मंजूरी देणे. मंजूर घरकुलांना पहिल्या हप्त्याचे १०० टक्के वितरण करणे. घरकुलांच्या उद्दिष्टानुसार १०० टक्के घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण करणे. प्रलंबित घरकुले पूर्ण करणे. सर्व घरकुले आर्थिकदृष्ट्या पूर्ण करणे. ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पूर्ण करणे. डेमो हाऊसेस उभारणे. कायमस्वरूपी प्रतिक्षा यादीतील लाभार्थ्यांचे आधार सिडींग व आवास प्लस मधील लाभार्थ्यांचे आधार सिडींग/जॉब कार्ड मॅपिंग १०० टक्के पूर्ण करणे. शासकीय योजनांशी कृतीसंगम करून लाभार्थ्यांना इतर शासकीय योजनांचा लाभ देणे. तसेच नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून बहुमजली इमारती, गृहसंकुल व सर्व नागरी सुविधायुक्त आदर्श घरकुलांची उभारणी करणे या विषयांवर आढावा घेण्यात आला.

त्याचप्रमाणे प्रत्यक तालुक्यात डेमो हाऊसची उभारणी करणे व घरकुल मार्ट सुरू करणे बाबत चर्चा करण्यात आली. तसेच अभियान कालावधीत १० उपक्रमांवर लक्ष केंद्रीत करून जास्तीत जास्त घरकुलांचे बांधकाम करण्याच्या सूचना डॉ. राजाराम दिघे यांनी बैठकीमध्ये उपस्थितांना दिल्या.




## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखाली कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांच्या साप्ताहिक आढावा बैठका

संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांचा कामाचा आढावा घेण्याकरीता माहे एप्रिल २०२१ मध्ये दिनांक १९, २७, ३०, माहे मे २०२१ मध्ये १४, १९, २४, ३० व माहे जून २०२१ मध्ये ४, ६ व १३ रोजी साप्ताहिक आढावा बैठका घेण्यात आल्या. सदर बैठकांना राज्य व्यवस्थापन कक्षातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकांमध्ये महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत अभियानाचे १० उपक्रम व विविध आवास योजनांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. कोरोना महामारीमुळे महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत घरकुल योजनांच्या कामात अपेक्षित प्रगती होवू शकली नाही. तसेच समोर येणारा पावसाळा ऋतू यामुळे घरकुल बांधकामाची मंदावणारी गती याबाबी लक्षात घेता अभियान कालावधीत जलद गतीने घरकुले बांधकाम करण्याच्या दृष्टीने नियोजन करणे बाबत चर्चा करण्यात आली. त्याकरीता अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी विभाग



निहाय आढावा बैठकांचे व्हिडीओ कॉन्फरन्सींग व्दारे आयोजन करण्याचे मा. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी संबंधितांना सूचित केले.

महा आवास अभियान-ग्रामीण राज्यस्तरीय समारोप व ई-गृहप्रवेश कार्यकमाबाबत चर्चा करण्यात आली. त्यानुषंगाने सदर कार्यक्रमात अभियान लघुपट प्रदर्शन, अभियान यशोगाथा पुस्तिका प्रकाशन, इंग्लिश मासिक बातमीपत्र प्रकाशन, वेब साईट प्रकाशन, राज्य व्यवस्थापन कक्षाची दिनदर्शिका प्रकाशन, अभियान फोटो गॅलरी व या कार्यक्रमासाठी जबाबदारी निश्‍चित करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. आय.आय.टी. मुंबई यांनी आयोजित केलेल्या प्रशिक्षकांचे प्रशिक्षण दुसरी बॅच प्रशिक्षण कार्यक्रमाबाबत चर्चा करण्यात आली. विविध आवास योजनांचे दैनंदिन व साप्ताहीक प्रगती अहवाल वेळेत तयार करून सादर करण्याच्या सूचना डॉ. राजाराम दिघे यांनी संबंधितांना दिल्या. ग्रामीण गवंडी प्रशिक्षण व महा आवास अभियान - ग्रामीण अंतर्गत उत्कृष्ट काम करणारे व्यक्ती व संस्था यांच्या पुरस्कार वितरण व गुणांकनाबाबत चर्चा करण्यात आली.

दिनांक १५ जून २०२१ रोजीच्या ई-गृहप्रवेश कार्यक्रमा संबधी राज्य व्यवस्थापन कक्षातील अधिकारी/ कर्मचारी यांना दिलेली जबाबदारी व काम वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना डॉ. राजाराम दिघे यांनी बैठकीमध्ये उपस्थितांना दिल्या.

## सहाय्यक संचालक (लेखा), राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सहाय्यक लेखाधिकारी यांची आढावा बैठक

दि. ०९.०४.२०२१ रोजी सहाय्यक संचालक (लेखा), राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, श्री.संतोष भांड यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील सर्व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेतील सहाय्यक लेखा अधिकारी यांची व्हिडिओ कॉन्फरन्सींग व्दारे आढावा बैठक घेण्यात आली.

या बैठकीमध्ये PFMS प्रणालीवरील सन २०२०-२१ मधील अखर्चित निधी सन २०२१-२२ मध्ये खर्च करणे. ग्रामीण घरकुल योजना व प्रशासकीय निधीचे सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखा परिक्षण पूर्ण करणे. राज्य योजना प्रशासकीय निधी PFMS प्रणालीवरील सुरू करणे. प्रधानमंत्री आवास योजनेच्या AFMS प्रणालीमार्फत प्रशासकीय निधीच्या खर्चाबाबत व इतर प्रलंबित देयकांच्या सद्यस्थिती बाबत आढावा घेण्यात आला. तसेच या बैठकीत लेखा विषयक अडचणी बाबत मार्गदर्शन करण्यात आले. त्याचप्रमाणे लेखा विषयक संपूर्ण दस्तावेज अद्यावत करणे व या कार्यालयाकडून दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे बाबत श्री.संतोष भांड यांनी उपस्थितांना सांगितले.



## नियोजनबद्ध कामगिरीमुळे डेमो हाऊस बांधकामात धुळे जिल्हा अव्वल स्थानी

### - श्रीमती वान्मथी सी., मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे

घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी व लाभार्थ्यांना मार्गदर्शक ठरण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत राज्यात सर्व जिल्ह्यांना प्रत्येक पंचायत समिती आवारात एक डेमो हाऊस बांधकामाचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. धुळे जिल्ह्यात धुळे, सिंदखेडा, शिरपूर व साक्री असे एकुण चार तालुके असून या चारही पंचायत समिती आवारामध्ये डेमो हाऊसेसचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व पंचायती समिती आवारामध्ये डेमो हाऊसेसचे बांधकाम पूर्ण करणारा धुळे जिल्हा हा विभागातच नाही तर राज्यातही अव्वल स्थानी आहे.

राज्यात महा आवास अभियान-ग्रामीण राबविण्यात येत असून या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे धुळे जिल्ह्यातील घरकुल बांधकामाच्या कामांना वेग आला आहे. याकरीता धुळे



जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती वान्मथी सी. यांनी ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासबंधित अधिकारी/ कर्मचारी यांच्या नियमित आढावा बैठका, क्षेत्रिय भेटी व उद्दिष्ट पूर्तीसाठी सुक्ष्म नियोजन केले. तसेच अभियान कालावधीत कामात दिरंगाई करणारे अधिकारी/कर्मचारी यांचे विरूध्द कारवाई करण्यात येईल अशीही ताकीद वेळ प्रसंगी श्रीमती वान्मथी सी. यांनी दिली.

श्रीमती वान्मथी सी. यांनी डेमो हाऊसेस बांधकामाला प्राधान्य क्रमावर ठेवून सर्व पंचायत समिती मध्ये भेटी देवून डेमो हाऊसेस बांधकामाच्या प्रगतीचा आढावा व बांधकामाची पहाणी केली. तसेच सर्व कामे कालमर्यादेत करण्यासाठी आराखडा तयार करून त्यानुसार नियोजनबद्ध कामगिरीमुळेच धुळे जिल्ह्यात आज चारही तालुक्यांमध्ये डेमो हाऊसचे बांधकाम काम पूर्ण झाले आहे.

या कामी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री. बी. एम. मोहन, सर्व पंचायत समितीचे गटविकास अधिकारी व उप अभियंता बांधकाम यांनी विशेष परिश्रम घेतले आहे. त्यांच्या या कामगीरीबद्दल सर्वस्तरावरून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होतो आहे.

## महा आवास अभियानामुळे जिल्ह्यात घरकुल उभारणीला गती
### - श्रीमती दीपाली पाटील, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सिंधुदुर्ग

महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत सिंधुदुर्ग जिल्ह्यात ८३७ मंजूर घरकुलांपैकी ८१६ घरकुलांना पहिल्या हप्ता वितरीत करण्यात आला असून नवीन ८७ मंजूर घरकुलांना पहिला हप्ता दिल्याने जिल्ह्यात घरकुल उभारणीच्या कामाला गती आली आहे. याकरीता सर्व शासकीय/निमशासकीय यंत्रणेने पुढाकार घेतल्याचे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक, श्रीमती दीपाली पाटील यांनी सांगितले.

राज्य शासनाकडून रमाई आवास योजनेच्या निधीची उपलब्धता झाल्याने लाभार्थ्यांना पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या हप्त्याचे वितरण जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून करण्यात आले आहे. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण तथा सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री, श्री.उदय सामंत यांनी नवीन १० घरकुलांना मंजूरी दिल्याने २०२०-२१ या वर्षाकरीता रमाई आवास योजनेचे उद्दिष्ट प्राप्त झाले असल्याचे श्रीमती दीपाली पाटील यांनी सांगितले.

अभियान कालावधीत जास्तीत जास्त घरकुले पूर्ण करण्यासाठी घरकुलांना मंजूरी व पहिल्या हप्त्याचे वितरण करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, श्री. प्राजित नायर यांनी जिल्ह्यात विशेष मोहिम राबवित असल्याचे श्रीमती दीपाली पाटील यांनी सांगितले.



## महा आवास अभियान-ग्रामीण यशस्वी करण्यासाठी सर्व घरकुले तात्काळ पूर्ण व्हावीत
### - श्री. प्रशांत काळे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, श्रीगोंदा

महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण भागातील घरकुल लाभार्थीसाठी विविध ग्रामीण आवास योजनेतील मंजूर असलेली सर्व घरकुले तात्काळ पुर्ण करणेबाबत तालुक्यात नियोजन करण्यात आले आहे. घरकुल बांधकामासाठी जागा नसलेल्या लाभार्थीना जागा उपलब्ध करणे, अपुर्ण बांधकामे पुर्ण करणे, अनुदान हप्ते तात्काळ लाभार्थींना अदा करण्यासाठी सर्व ग्रामपंचायत पातळीवर पालक अधिकारी, ग्रामसेवक, सरपंच, तालुका स्तरावरील सर्व यंत्रणाच्या मदतीने घरकुले पुर्ण करण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

या अभियानाचे निमित्ताने सर्व योजनांचे मंजूर घरकुल लाभार्थ्यांनी तात्काळ घरकुल बांधकाम पुर्ण करावीत, घरकुल बांधकामासाठी टप्पानुसार मिळणारे अनुदान तात्काळ लाभार्थीना अदा करण्यात येईल. तसेच श्रीगोंदा तालुक्यातील सर्व पदाधिकारी, अधिकारी व घरकुल लाभार्थीनी महाआवास अभियान यशस्वीपणे राबविण्यासाठी सर्व घरकुले अभियान कालावधीत पुर्ण करण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन गटविकास अधिकारी, श्री. प्रशांत काळे यांनी केले आहे.

## मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते महा आवास अभियान-ग्रामीण यशोगाथा पुस्तक प्रकाशन, दिनदर्शिका प्रकाशन व महा आवास संकेत स्थळाचा शुभारंभ

दि. १५ जून, २०२१ रोजी महा आवास ग्रामीण ई-गृहप्रवेश कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमा प्रसंगी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालया मार्फत निर्मित करण्यात आलेल्या महा आवास अभियान-ग्रामीणची यशोगाथा पुस्तकाचे प्रकाशन, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाची दिनदर्शिका (शैक्षणिक वर्ष सन २०२१-२२) प्रकाशन व महा आवास संकेत स्थळाचा शुभारंभ मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शुभहस्ते व मा.मंत्री, ग्राम विकास, श्री.हसन मुश्रीफ, मा. मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, श्री. धनंजय मुंडे, मा. राज्यमंत्री, ग्राम विकास व महसूल, श्री. अब्दुल सत्तार, मा. मुख्यमंत्री यांचे अतिरिक्त मुख्य सचिव, श्री.आशिषकुमार सिंह, मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार, मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, श्री. विकास खारगे, मा. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. श्याम तागडे, मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, श्री. आबासाहेब जऱ्हाड, संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला.

### महा आवास अभियान-ग्रामीण यशोगाथा

राज्यात दिनांक २० नोव्हेंबर २०२० ते ०५ जून २०२१ या कालावधीत महा आवास अभियान-ग्रामीण यशस्वी अंमलबजावणी करण्यात आली. या अभियानामुळे कोरोना महामारीचे संकट असताना सुध्दा ग्रामीण आवास योजनांची कामे अधिक गतिमान व गुणवत्तापूर्ण झाली आहे. त्यामुळे हे अभियान ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासाठी यशोगाथा ठरले आहे. त्यानुषंगाने संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने अभियान कालावधीत घडलेल्या सर्व घडामोडींचा मागोवा घेण्यासाठी "महा आवास अभियान-ग्रामीण यशोगाथा" या पुस्तकाची निर्मिती केली आहे.

या पुस्तकामध्ये अभियान राबविण्याचे उद्देश, अभियान पूर्व तयारी व मान्यता, राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळा, ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील भागधारकांसाठी राबविण्यात आलेले क्षमता बांधणी उपक्रम, अभियानाच्या प्रचार, प्रसिध्दी व जनजागृतीसाठी राबविण्यात आलेले माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम, अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संनियंत्रण व मूल्यमापन उपक्रम, विविध शासकीय विभागांशी समन्वय बैठका, विविध कॉर्पोरेट संस्थांशी भागीदारी, धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी शासनास मदत, अभियानाला वेळोवेळी दिलेली मुदतवाढ, जागतिक महिला दिनी घरकुल लाभार्थ्यांसाठी विशेष कार्यक्रम, अभियानाच्या यशस्वीतेसाठी लोकसहभाग, अभियान कालावधीत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची फलश्रुती, उपक्रम निहाय प्रगती अहवाल, अभियान कालावधीतील घरकुले, बहुमजली इमारती, गृहसंकुले, डेमो हाऊसेस याबाबतची फोटो गॅलरी व विविध वृत्तपत्रातील बातम्यांची मिडिया गॅलरी इ. बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

### राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण दिनदर्शिका (शैक्षणिक वर्ष २०२१-२२)

संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालयाने माहे जून २०२१ ते मे २०२२ या शैक्षणिक वर्षाकरीता दिनदर्शिका निर्मिती केली आहे.

या दिनदर्शिकेमध्ये महा आवास अभियानाचे उद्देश, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध ग्रामीण





आवास योजना, भूमीहीन लाभार्थ्यांसाठी जागा उपलब्धता, ग्रामीण गवंडी प्रशिक्षण, डेमो हाऊसेस, शासकीय योजनांशी कृतीसंगम, बहुमजली इमारती, गृहसंकुल, घरकुल मार्ट, गृह कर्ज, आदर्श घरांची निर्मिती, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालय भूमिका व जबाबदारी व ग्रामीण आवास योजनेच्या पात्रतेचे निकष या विषयीची सर्वांसाठी उपयुक्त माहिती यामध्ये समाविष्ठ केली आहे.

### महा आवास संकेत स्थळ

ग्रामीण भागातील जनतेला हक्काचा निवारा मिळावा यासाठी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयामार्फत विविध आवास योजना राबविल्या जातात. ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील सर्व अद्यावत घडामोडीचे आदान प्रदान होण्यासाठी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने महा आवास (mahaawaas.com) या संकेत स्थळाची निर्मिती केली आहे.

या संकेत स्थळावर मान्यवरांची माहिती, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालया विषयी माहिती, कार्यालय संरचना, राज्यात राबविण्यात येणाऱ्या विविध ग्रामीण आवास योजना, वेळोवेळी केंद्र व राज्य शासनाकडून निर्गमित करण्यात येणाऱ्या मार्गदर्शक सूचना, शासन निर्णय, डेमो हाऊसेस, महा आवास अभियान-ग्रामीण, दैनंदिन, साप्ताहिक व इतर अहवाल, फोटो, व्हिडिओ, बातमीपत्र, व्हिडिओ जाहिराती, जिंगल्स, या कार्यालयाकडून प्रकाशित होणारे महा आवास मासिक वार्तापत्र, महा आवास त्रैमासिक अंक, मार्गदर्शक पुस्तिका व इतर माहिती, शिक्षण व संवाद साहित्य, धोरणात्मक व महत्वाचे पत्र, PPT, पुढील नियोजन कार्यक्रम, एम.आय.एस. डेटा एन्ट्री, एफ.टी.ओ. ट्रॅकींग, तक्रार निवारण, महत्वाचे दुवे लिंक, सोशल मिडिया लिंक व कार्यालयाशी संपर्क याबाबतच्या माहिती सर्वांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे.






## महा आवास अभियान-ग्रामीण ई-गृहप्रवेश कार्यक्रमाकरीता विविध माहिती, शिक्षण व संवाद साहित्याची निर्मिती

दिनांक १५ जून, २०२१ रोजी संपन्न झालेल्या ई-गृहप्रवेश कार्यक्रमांकरीता राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने अभियान लघुपट, बॅकड्रॉप, डेमो हाऊसेस मॉडेल, स्टॅण्डीस व इतर माहिती, शिक्षण व संवाद साहित्याची निर्मिती करण्यात आली होती.

दिनांक २० नोव्हेंबर २०२० ते ०५ जून २०२१ या कलावधीत महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत राबविण्यात आलेले १० उपक्रम, भागधारकांसाठी क्षमता बांधणी उपक्रम, प्रचार, प्रसिध्दी व जनजागृतीसाठी माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम, संनियंत्रण व मूल्यमापन उपक्रम, विविध शासकीय विभागांशी समन्वय उपक्रम, विविध कॉर्पोरेट संस्थांशी भागीदारी, लोकसहभाग, अभियान कालाधीत पूर्ण झालेली घरकुले, बहुमजली इमारती, गृहसंकुले, डेमो हाऊसेस, ग्रामीण गवंडी प्रशिक्षण, इ. उपक्रम राबवून महा आवास अभियान-ग्रामीणची यशस्वी वाटचाल दर्शविणाऱ्या लघुपटाची निर्मिती राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालया मार्फत करण्यात आली आहे. हा लघुपट ई-गृहप्रवेश कार्यक्रमा प्रसंगी दाखविण्यात आला.

हा लघुपट पाहून मा. मुख्यमंत्री यांनी अभियान कालावधीत ग्रामीण घरकुलांची कामे विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून जलद गतीने झाल्याची प्रतिक्रीया मा. मुख्यमंत्री महादयांनी दिली.

ई-गृहप्रवेश कार्यक्रमाकरीता बॅकड्रॉपची निर्मिती करण्यात आली. या बॅकड्रॉपचा वापर सर्व स्तरावर ई-गृहप्रवेश कार्यक्रमाकरीता व्हावा व कार्यक्रमता एकसमानता यावी, यासाठी बॅकड्रॉप राज्यातील सर्व स्तरांवर ईमेलव्दारे पाठवून त्याच्या प्रिंट काढून कार्यक्रमात वापरण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या.

ई-गृहप्रवेश कार्यक्रमाप्रसंगी डेमो हाऊसेस मॉडेल प्रदर्शन भरवण्यात आले. याकरीता राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने राज्यातील विभागनिहाय भौगोलिक परिस्थिती अनुरूप डेमो हाऊसेस मॉडेलची निर्मिती केली.

दिनांक २० नोव्हेंबर २०२० रोजी महा आवास अभियान-ग्रामीण राज्यस्तरीय शुभारंभा प्रसंगी राज्यात राबविण्यात येणाऱ्या विविध आवास योजनांची माहिती दर्शविणाऱ्या स्टॅण्डीजची निर्मिती करण्यात आली होती. त्याचप्रमाणे ई-गृहप्रवेश कार्यक्रमाकरीता अभियान कालावधीत राबविण्यात आलेले नाविन्यपूर्ण उपक्रम जसे - बहुमजली इमारती, गृहसंकुल, ग्रामीण गवंडी प्रशिक्षण, गृह कर्ज, घरकुल मार्ट, डेमो हाऊसेस व कृतीसंगम, इ. स्टॅण्डीची निर्मिती करण्यात आली.

ई-गृहप्रवेश कार्यक्रम सर्व सामान्यांनाही पहाता यावा याकरीता फेसबुक लाईव्ह, युटूब लाईव्ह व वेबिनार या माध्यमाव्दारे या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. त्यामुळे राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील सर्व स्तरावरील लोकांनी या कार्यक्रमाचा लाभ घेता आला.



## मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांच्या शुभहस्ते महा आवास त्रैमासिकाचे प्रकाशन

ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील घडामोडीचा मागोवा घेण्यासाठी व ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील नावीन्यपूर्ण उपक्रमांना प्रसिध्दी देण्यासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालयाकडून महा आवास त्रैमासिक प्रकाशित करण्यात येते. माहे जानेवारी २०२१ ते मार्च २०२१ या कालावधीतील त्रैमासिकाच्या तिसऱ्या अंकाचे प्रकाशन दि. २१ मे २०२१ रोजी मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री.राजेश कुमार यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

माहे जानेवारी २०२१ ते मार्च २०२१ या त्रैमासिकाच्या अंकात अभियान कालावधीत अभियान यशस्वीतेसाठी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मा.मंत्री, ग्राम विकास, मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल, मा. मुख्य सचिव व मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांचे लोकप्रतिनिधी व शासकीय यंत्रणेला महा आवास अभियान-ग्रामीण मध्ये सक्रीय सहभाग देणेबाबतचे आवाहनपर पत्र, राज्य, विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावर शासकीय यंत्रणा, लोकप्रतिनिधी, लाभार्थी व ग्रामस्थ यांनी राबविलेले विविध उपक्रम, आढावा बैठकी, क्षेत्रीय भेटी, विविध शासकीय विभागांशी समन्वय बैठका, विविध कॉर्पोरेट व शैक्षणिक संस्थाशी भागीदारी बैठका, भागीदारीची घोषणा, अभियानाला मुदतवाढ, क्षमता बांधणी कार्यशाळा व प्रशिक्षण, जागतिक महिला दिना निमित्त राबविण्यात आलेले विविध उपक्रम, शासकीय अधिकारी, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, लाभार्थी व ग्रामस्थ यांचा अभियान यशस्वीतेसाठी लोकसहभाग, माहिती, शिक्षण व संवाद उपक्रमांतर्गत व्हिडीओ जाहिराती, जिंगल्सची निर्मिती व प्रसारण, राबविण्यात आलेले नाविन्यपूर्ण उपक्रम, केंद्र व राज्य शासनाला दिलेले इनपुट, यशोगाथा, विविध आवास योजनांची सद्यस्थिती व ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात घडलेल्या विविध घडामोडींचा मागोवा घेण्यात आला.

याप्रसंगी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ. राजाराम दिघे, राज्य व्यवस्थापन कक्षाचे श्री. नीलेश काळे (उपसंचालक), श्रीमती मंजिरी टकले (उपसंचालक) व सहा. संचालक (लेखा) श्री. संतोष भांड उपस्थित होते. त्यासोबत दूरदृष्य प्रणालीव्दारे (VC) सर्व विभागीय आयुक्त कार्यालयाचे उप आयुक्त (विकास), जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, सर्व जिल्हा परिषदेचे उपमुख्य अधिकारी (पंचायत) व इतर संबंधित अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.



## मा. आमदार, श्री. रोहित पवार यांच्या शुभहस्ते कर्जत येथे डेमो हाऊसचे लोकार्पण

घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी व लाभार्थ्यांना मार्गदर्शक ठरण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत जिल्ह्यास दिलेल्या उद्दिष्टाप्रमाणे पंचायत समिती निहाय सर्व डेमो हाऊसेस (Demo Houses) पूर्ण करण्याचा उपक्रम अभियानात राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत पंचायत समिती आवारात उभारण्यात आलेल्या डेमो हाऊसचे लोकार्पण दि. २४ मे २०२१ रोजी कर्जत-जामखेड तालुक्यांचे लोकप्रिय मा. आमदार, श्री. रोहित पवार यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

राज्यात ३५१ पंचायत समिती असून अभियान कालावधीत या सर्व पंचायत समिती आवारात डेमो हाऊसेस उभारण्याच्या कामास गती देण्यात आली असून अभियान कालावधीत मोठ्या प्रमाणात डेमो हाऊसेसची उभारणी करण्यात यश आले आहे.

या प्रसंगी मा. आमदार, श्री. रोहित पवार म्हणाले, डेमो हाऊसेस बांधकामात नाशिक विभाग अव्वल क्रमांकावर असून अहमदनगर जिल्ह्यात बहुतांश डेमो हाऊसेसचे काम पूर्ण झाले असून उर्वरीत डेमो हाउसेस येत्या कालावधीत पूर्ण होईल. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी मा. आमदार, श्री. रोहित पवार यांनी जिल्हा परिषद अध्यक्ष, पंचायत समिती सभापती, सदस्य, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व गट विकास अधिकारी यांना शुभेच्छा दिल्या.






## महा आवास अभियान पुरस्कार २०२०-२१
## ग्रामपंचायत स्तरीय पुरस्कारांचे वितरण

ग्राम विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. :प्रआयो-२०२०/प्र.क्र.१०७/योजना-१०, दि.१० जून, २०२१ अन्वये राज्यातील सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे व त्यामध्ये गुणवत्ता आणणे यासाठी दिनांक २० नोव्हेंबर २०२० ते ०५ जून २०२१ या कालावधीत महा आवास अभियान-ग्रामीण मध्ये राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे मूल्यमापन करून उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना महा आवास अभियान पुरस्कार व महा आवास अभियान विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

दिनांक १० जून, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये तालुकास्तरीय अंमबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीने ग्रामपंचायतस्तरीय पुरस्कारांची नामांकणे व निवड दिनांक २१ जून, २०२१ रोजी पर्यंत करून निवड केलेल्या पुरस्कार विजेत्यांचा अहवाल वरिष्ठ पातळीवरील समितीकडे सादर करण्याचे सूचित केले आहे.

तसेच ग्रामपंचायतस्तरीय पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम ग्राम पंचायत स्तरावर जून २०२१ या महिन्यात संबंधित ग्राम पंचायतीचे सरपंच यांचे शुभहस्ते करण्याचे सदर शासन निर्णयात नमुद आहे. त्याकरीता संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने प्रशस्तीपत्रकाचे डिझाईन तयार करून पुरस्कार विजेत्यांना प्रदान करण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे.

त्यानुसार राज्यातील बहुतांश ग्रामपंचायतीमध्ये ग्रामपंचायतस्तरीय पुरस्कार नमांकने निवडीची प्रक्रीय पूर्ण करण्यात आली असून ग्रामपंचायतींचे सरपंच यांच्या हस्ते विजेत्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले आहे.



## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखाली महा आवास अभियान पुरस्कार मूल्यांकन व पुरस्कार वितरणासाठी समन्वय बैठक


ग्राम विकास विभाग यांचेकडील दि.१० जून, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे व त्यामध्ये गुणवत्ता आणणे यासाठी दिनांक २० नोव्हेंबर २०२० ते ०५ जून २०२१ या कालावधीत महा आवास अभियान-ग्रामीण मध्ये राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे मूल्यमापन करून उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना महा आवास अभियान पुरस्कार व महा आवास अभियान विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

त्यानुषंगाने सदर शासन निर्णायातील सूचनांचे काटेकोरपणे पालन व्हावे तसेच विविध स्तरावरील पुरस्कार मानांकने निवड व पुरस्कार वितरणासबंधी विविध मुद्यांवर चर्चा करण्यासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांच्या अध्यक्षतेखाली व राज्य व्यवस्थापन कक्षाचे अधिकारी यांच्या उपस्थितीत दिनांक २१ जून २०२१ रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सिंग माध्यमातून समन्वय बैठक घेण्यात आली

या बैठकीला विभागीय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त (विकास), सहाय्यक आयुक्त (विकास), जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी व इतर संबंधित अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये डॉ. राजाराम दिघे यांनी उपस्थितांना पुरस्कार नामांकन निवडीचे निकष व गुणांकन पध्दती बाबत सादरीकरण्याच्या माध्यमातून सविस्तर माहिती दिली. त्याचप्रमाणे या मूल्यांकन पध्दती संबंधी विविध स्तरावरील अडचणी बाबत मार्गदर्शन करून त्यांच्या शंकाचे निराकरण केले. त्याचप्रमाणे दि. १० जून २०२१ च्या शासन निर्णयाचे वाचन करून शासन निर्णयातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना डॉ. राजाराम दिघे यांनी उपस्थितांना दिल्यात.

ग्रामस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार विजेत्यांना प्रदान करावयाचे प्रशस्तीपत्राचे डिझाईन या कार्यालयाकडून ग्रामपंचायतींना उपलब्ध करून देण्यात आले असून तालुका, जिल्हा व विभागस्तरावरून प्रदान करावयाचे मानचिन्ह व प्रशस्तीपत्राचे डिझाईन स्वतंत्रपणे पाठविण्यात येणार असल्याचे डॉ. राजाराम दिघे यांनी सांगितले. तसेच शासन निर्णयातील सूचनान्वये त्या त्या स्तरावरील पुरस्कार नामांकन निवड व पुरस्कार वितरण विहीत मुदतीत करण्याच्या सूचनाही संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी उपस्थितांना दिल्या.




## प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण प्रगतीबाबत ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार कार्यालयाकडून आढावा

दि. ०८.०४.२०२१ व ९.०६.२०२१ रोजी मा.सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या प्रगतीबाबत सर्व राज्यांच्या आढावा बैठका घेतल्या. या बैठकीला महाराष्ट्र राज्यातून संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे उपस्थित होते.

या बैठकीमध्ये दिनांक १५ ते ३० एप्रिल २०२१ पर्यंत १ लाख घरकुले पूर्ण करण्याचे उद्दिष्ट राज्यास देण्यात आले होते. सदर उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी राज्यात दररोज ५०० घरकुले पूर्ण करणे गरजेचे असल्याचे सांगण्यात आले.

त्यानुषंगाने पंचायत समिती स्तरावरून घरकुलांचे फोटो दोन दिवसात Verify करणे. भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेल्या घरकुलांचे फोटो आवास प्रणालीवर अपलोड करणे. किरकोळ बांधकाम अपूर्ण असलेली घरकुले तात्काळ पूर्ण करणे. लिंटेल लेव्हल वरील घरकुले १५ एप्रिल पर्यंत पूर्ण करणे. प्लिंथ



लेव्हल वरील घरकुले ३० एप्रिल पर्यंत पूर्ण करणे. घरकुलांना लाईन आउट देवून बांधकाम सुरू करणे. घरकुलांना १०० टक्के मंजूरी देणे. Delayed Houses तात्काळ पूर्ण करणे. लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देवून घरकुलांसाठी जागा उपलब्ध करून देणे. कायम स्वरूपी प्रतीक्षा यादी मधील अपात्र लाभार्थी तात्काळ रिमांड करणे. अशा प्रकारचे नियोजन करणेकामी सूचना जिल्ह्यांना देवून काम पूर्ण करणार असल्याचे डॉ. राजाराम दिघे यांनी बैठकीमध्ये सांगितले.

## अभियान कालावधीत ग्रामीण गवंडी प्रशिक्षणाच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण घरकुलांच्या निर्मितीसाठी गवंडी प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांच्या साप्ताहिक आढावा बैठका

मा. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांच्या अध्यक्षतेखाली प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमांचा आढावा घेण्यासाठी साप्ताहिक बैठकांचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार माहे एप्रिल, मे व जून २०२१ मध्ये प्रत्येक आठवड्यात दर सोमवारी ग्रामीण गवंडी प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेचे पदाधिकारी तसेच राज्य व्यवस्थापन कक्षातील अधिकारी/कर्मचारी यांच्या बैठका घेण्यात आल्या.

या बैठकांमध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमाच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला. तसेच आभियानात राबविण्यात येत असलेल्या डेमो हाऊस या उपक्रमाबाबत संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना थोडक्यात माहिती दिली.

ग्रामीण गंवडी प्रशिक्षण विहीत मुदतीत पूर्ण करणे, संस्थाचे अधिकारी/ पदाधिकारी यांनी प्रत्यक्षात क्षेत्रीय भेट देवून अपूर्ण व मंजूरी दिलेली घरकुले जलद गतीने पूर्ण करणे, प्रशिक्षित गवंडयांचे मुल्यांकन सी. एस. डी. सी. आय. मार्फत करणे, गवंडी प्रशिक्षणाचे काम गतिमान व गुणवत्तापूर्ण करणे, लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम करणेसाठी मार्गदर्शक ठरेल असे एक डेमो हाऊस प्रत्येक पंचायत समिती आवारात निर्मितीचे काम संस्थामार्फत करणे या विषयी चर्चा करण्यात आली. तसेच या कार्यक्रमाच्या अंमलबजावणी मध्ये येणाऱ्या अडीअडचणींबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. ग्रामीण गवंडी प्रशिक्षणाच्या कामाला अधिक गतीमान करण्याच्या सूचना मा.संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी उपस्थितांना दिल्या.




## ग्राम विकास व महसूल विभागाच्या समन्वयाने सावनेरच्या भूमीहीनांचे घरकुलांचे स्वप्न पूर्ण

यवतमाळ जिल्ह्यातील पंचायत समिती राळेगाव अंतर्गत सावनेर ग्रामपंचायतीमध्ये घरकुलास पात्र असतांनाही स्वमालकीची जागा नसल्यामुळे घरकुलास वंचित असलेल्या लाभार्थ्यांना पंडित दीनदयाळ जागा खरेदी योजनेतून जागा उपलब्ध करून देण्यात आल्याने या भूमिहीन लाभार्थ्यांचे स्वतःच्या घराचे स्वप्न आता पूर्ण होणार आहे.

ग्रामपंचायत सावनेर येथील सन २०१८-२०१९ या वर्षातील पारधी आवास योजने अंतर्गत १४ लाभार्थ्यांच्या घरकुलास मंजूरी देण्यात आली आहे. परंतु प्रधानमंत्री आवास योजनेच्या ५ लाभार्थ्यांना घरकुलास पात्र असूनही जागे अभावी घरकुलाचा लाभ मिळत नव्हता. याकरीता राळेगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, श्री. रविकांत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली घरकुल लाभार्थ्यांची बैठक घवून या बैठकीमध्ये पंडित दीनदयाळ जागा खरेदी योजने विषयी लाभार्थ्यांना मार्गदर्शन केले.

श्री. रविकांत पवार व लाभार्थ्यांशी झालेल्या बैठकीत घरकुल बांधकामासाठी गावातील शेतकऱ्याची जागा निवडण्यात आली. सदर जागा ही शेतीसाठी वापरण्यात येत असल्याने राळेगावचे तहसिलदार श्री.रवींद्र कानडे यांच्या समन्वयाने सदरची जागा ४२ ड अंतर्गत अकृषिक केली. अशा प्रकारे ग्राम विकास व महसूल विभागाच्या समन्वयाने घरकुल लाभार्थ्यांना १००० चौ फूट जागा उपलब्ध करून देण्यात आली.



# केंद्र व राज्य सरकार यांना ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासंबंधी पॉलिसी इनपुट

## महा आवास अभियान-ग्रामीण ई-गृहप्रवेश कार्यक्रम

राज्यातील सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे व त्यामध्ये गुणवत्ता आणणे यासाठी दिनांक २० नोव्हेंबर २०२० ते ०५ जून २०२१ या कालावधीत महा आवास अभियान-ग्रामीण राबविण्यात आले.

या अभियानांतर्गत विविध उपक्रम राबवून सर्व नागरी सुविधायुक्त घरकुलांची निर्मिती करण्यात आली. अभियान कालावधीत भूमीहीन लाभार्थ्यांना जागा, बहुमजली इमारती, जागेची उपलब्धता असल्यास गृहसंकुल, विविध शासकीय योजनांच्या कृतीसंगमातून लाभार्थ्यांना इतर योजनांचा लाभ, ग्रामीण गवंडी प्रशिक्षणातून गुणवत्तापूर्ण घरकुलांची निर्मिती, इ. उपक्रम राबवून अभियान कालावधीत ग्रामीण भागात घरकुलांची निर्मिती करण्यात आली.

अभियान कालावधीत घरकुल पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांच्या गृहप्रवेशासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालयाने ई-गृहप्रवेश कार्यक्रमाचा प्रस्ताव मा. मंत्री, ग्राम विकास व मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांना सादर केला.

सदरचा प्रस्ताव शासनाने मान्य केल्याने अभियान कालावधीत घरकुले पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांसाठी ई-गृहप्रवेश कार्यक्रम मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते दिनांक १५ जून, २०२१ रोजी संपन्न झाला. या ई-गृहप्रवेश कार्यक्रमामुळे घरकुल लाभार्थ्यांमध्ये अत्यंत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या ई-गृहप्रवेश कार्यक्रमामुळे आज लाखो घरकुल लाभार्थ्यांना एक सोबत गृहप्रवेश केला, अशी प्रतिक्रिया मा. मुख्यमंत्री यांनी दिली.



## महा आवास अभियान-ग्रामीण मधील उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था/व्यक्तींना महा आवास अभियान पुरस्कार

राज्यातील सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे व त्यामध्ये गुणवत्ता आणणे यासाठी दिनांक २० नोव्हेंबर २०२० ते ०५ जून २०२१ या कालावधीत महा आवास अभियान-ग्रामीण मध्ये राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे मूल्यमापन करून उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना गौरविण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्यानुषंगाने ग्राम विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. :प्रआयो-२०२०/प्र.क्र.१०७/योजना-१०, दि.१० जून, २०२१ अन्वये अशा व्यक्ती किंवा संस्था यांना महा आवास अभियान पुरस्कार व महा आवास अभियान विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

त्याकरीता पुरस्कार मानंकने निवडीचे निकष, गुणांकन पध्दती, गुणांकन करण्यासाठी समितीचे गठण, पुरस्काराचे क्रमांक, पुरस्काराचे स्वरूप, पुरस्कार वितरणाची कालमर्यादा व याकरीता लागणारा निधी याबाबतची सविस्तर माहिती दि. १० जून, २०२१ रोजीच्या शासन निर्णयात दिलेली आहे.

महा आवास अभियान पुरस्कार अंतर्गत राज्य, विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरावरील सर्वोत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था किंवा व्यक्ती यांना केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांचे प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांचे स्वतंत्र पारोतिषीक देवून गौरविण्यात येणार आहे. तसेच महा आवास अभियान विशेष पुरस्कार अंतर्गत अभियान कालावधीतील संख्यात्मक प्रगतीनूसार अभियानात राबविण्यात आलेल्या १० उपक्रमांमध्ये सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्था यांना राज्य स्तरावरून प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांकाचे पारितोषिक देवून गौरविण्यात येणार आहे.

या पुरस्कारामुळे अभियान कालावधीत उत्कृष्ट काम करणाऱ्यांच्या कामाची शासन स्तरावरून दखल घेतली जात असल्याची प्रतिक्रिया सर्व स्तरावरून व्यक्त केली जात आहे.



# प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण सन २०१६-१७ ते २०२०-२१

## संचित प्रगती अहवाल - ३० जून २०२१

| अ. क्र. | विभाग | जिल्हा | उदिष्ट | मंजूर घरकुले | पूर्ण झालेली घरकुले | | राज्य रँक | राष्ट्रीय रँक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | संख्या | टक्केवारी % | | |
| १ | कोकण | ठाणे | ६७३४ | ६७०४ | ६१६१ | ९१.९ | १ | १०४ |
| २ | कोकण | पालघर | २५६८९ | २५६६५ | २३०५६ | ८९.८ | २ | १२८ |
| ३ | कोकण | रायगड | ७८४६ | ७७३६ | ६८२८ | ८८.३ | ३ | २२९ |
| ४ | कोकण | रत्नागिरी | ६०८८ | ६०५५ | ५०१६ | ८२.८ | ४ | २०३ |
| ५ | कोकण | सिंधुदुर्ग | ३९९४ | ३६६१ | ३०१३ | ८२.३ | ५ | ३१८ |
| कोकण विभाग | | | ५०३५१ | ४९८२१ | ४४०७४ | ८८.५ | | |
| ६ | नाशिक | नाशिक | ७०४१२ | ६८४८९ | ५३२२२ | ७७.७ | ८ | २०५ |
| ७ | नाशिक | धुळे | ४६६०१ | ४६४२० | ३५९७४ | ७७.५ | ९ | २५७ |
| ८ | नाशिक | नंदुरबार | १०५७४६ | ९९५३३ | ७१२६९ | ७१.६ | १३ | ३११ |
| ९ | नाशिक | अहमदनगर | ४७८६१ | ४१८६७ | २८८६५ | ६८.९ | १७ | ४१९ |
| १० | नाशिक | जळगाव | ६६०९६ | ५४४३० | ३५०११ | ६४.३ | २६ | ४६९ |
| नाशिक विभाग | | | ३३६७१६ | ३१०७३९ | २२४३४१ | ७२.२ | | |
| ११ | नागपूर | गोंदिया | ८२३८४ | ८२३८४ | ६६०६८ | ८०.२ | ६ | २४८ |
| १२ | नागपूर | वर्धा | १६१९२ | १३०७२ | ९२३८ | ७०.७ | १४ | ३७८ |
| १३ | नागपूर | चंद्रपुर | ३१९८६ | २८३५५ | १९६१० | ६९.२ | १६ | ३२८ |
| १४ | नागपूर | गडचिरोली | २३०५० | २१८१८ | १४६६७ | ६७.२ | १९ | ३३५ |
| १५ | नागपूर | नागपूर | ३९५३२ | ३२५७१ | २०२३९ | ६२.१ | २८ | ४२० |
| १६ | नागपूर | भंडारा | ५६०९९ | ५१५७९ | २८२२१ | ५४.७ | ३३ | ४२६ |
| नागपूर विभाग | | | २४९२४३ | २२९७७९ | १५८०४३ | ६८.८ | | |
| १७ | अमरावती | अमरावती | ९१४७७ | ६८२०८ | ४५३२० | ६६.४ | २१ | ४६३ |
| १८ | अमरावती | बुलढाणा | २८३१० | २३८१५ | १५७९४ | ६६.३ | २२ | ३९१ |
| १९ | अमरावती | अकोला | ४४५६१ | ३८३१९ | २४८५६ | ६४.९ | २५ | ४३० |
| २० | अमरावती | वाशिम | १०७८७ | ८९१४ | ५६९५ | ६३.९ | २७ | ४४६ |
| २१ | अमरावती | यवतमाळ | ३९८९७ | ३८५४४ | २३११४ | ६०.० | ३१ | ३४२ |
| अमरावती विभाग | | | २१५०३२ | १७७८०० | ११४७७९ | ६४.६ | | |
| २२ | पुणे | कोल्हापूर | १४४६२ | १३०११ | ९८६६ | ७५.८ | १० | २६१ |
| २३ | पुणे | सातारा | १३४७१ | ११११९६ | ७६०० | ६७.९ | १८ | ३३२ |
| २४ | पुणे | पुणे | १८९४३ | १५३०३ | १००५३ | ६५.७ | २४ | ४३१ |
| २५ | पुणे | सांगली | १८६५० | १५७८२ | ९७०८ | ६१.५ | २९ | ४०७ |
| २६ | पुणे | सोलापूर | ४४७१२ | ३६२८१ | २१७९६ | ६०.१ | ३० | ४०९ |
| पुणे विभाग | | | ११०२३८ | ९१५७३ | ५९०२३ | ६४.५ | | |
| २७ | औरंगाबाद | हिंगोली | १०१२८ | ९४९२ | ७४३९ | ७८.४ | ७ | ३६३ |
| २८ | औरंगाबाद | लातूर | १०९६८ | ९२६० | ६९११ | ७४.६ | ११ | ३४० |
| २९ | औरंगाबाद | उस्मानाबाद | ६०४८ | ५३१२ | ३८९२ | ७३.३ | १२ | ३४१ |
| ३० | औरंगाबाद | परभणी | ७१४१ | ६७५८ | ४७६२ | ७०.५ | १५ | ३६६ |
| ३१ | औरंगाबाद | जालना | १३३३६ | ११५३१ | ७६७० | ६६.५ | २० | ४२९ |
| ३२ | औरंगाबाद | औरंगाबाद | २२१३६ | २२१११ | १४६२५ | ६६.१ | २३ | ३०९ |
| ३३ | औरंगाबाद | बीड | १९६९९ | १८२२४ | १०८७६ | ५९.७ | ३२ | ४१६ |
| ३४ | औरंगाबाद | नांदेड | ४९१६९ | ४५१६८ | २२२३९ | ४९.२ | ३४ | ४७६ |
| औरंगाबाद विभाग | | | १३८६२५ | १२७८५६ | ७८४१४ | ६१.३ | | |
| एकूण | | | ११००२०५ | ९८७५६८ | ६७८६७४ | ६८.७ | | |

# रमाई आवास योजना सन २०१६-१७ ते २०१९-२०
## संचित प्रगती अहवाल - ३० जून २०२१

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर घरकुले | पूर्ण झालेली घरकुले | | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | संख्या | टक्केवारी % | |
| १ | कोकण | रत्नागिरी | ५६८४ | ५६८४ | ४८९९ | ८६.२ | १ |
| २ | कोकण | सिंधुदुर्ग | १७७५ | १७७४ | १५१३ | ८५.३ | २ |
| ३ | कोकण | रायगड | १६८९ | १६८१ | १३४७ | ८०.१ | ४ |
| ४ | कोकण | ठाणे | १०२१ | १०१४ | ८०७ | ७९.६ | ५ |
| ५ | कोकण | पालघर | ४४६ | ३९५ | २६९ | ६८.१ | १८ |
| कोकण विभाग | | | १०६१५ | १०५४८ | ८८३५ | ८३.८ | |
| ६ | पुणे | कोल्हापूर | १०८८२ | १०८२२ | ८८८६ | ८२.१ | ३ |
| ७ | पुणे | सोलापूर | १४५९७ | १४४७७ | ११९५१ | ७७.० | ७ |
| ८ | पुणे | सातारा | ९४०८ | ९४०५ | ७२२५ | ७६.८ | ८ |
| ९ | पुणे | पुणे | ८०५९ | ७६५० | ५३५४ | ७०.० | १५ |
| १० | पुणे | सांगली | ६९८४ | ६८२३ | ४७२१ | ६९.२ | १७ |
| पुणे विभाग | | | ४९९३० | ४९१७७ | ३७३३७ | ७५.९ | |
| ११ | नाशिक | धुळे | ५५४९ | ५५२६ | ३९५७ | ७१.६ | १२ |
| १२ | नाशिक | अहमदनगर | २४९०० | २४८९९ | १७६५० | ७०.९ | १४ |
| १३ | नाशिक | नंदूरबार | २७१९ | २३१९ | १४३३ | ६१.८ | २३ |
| १४ | नाशिक | नाशिक | ९२७७ | ९१५६ | ५४५३ | ५९.६ | २५ |
| १५ | नाशिक | जळगाव | १२३५१ | १२३१५ | ७१४१ | ५८.० | २६ |
| नाशिक विभाग | | | ५४७९६ | ५४२१५ | ३५६३४ | ६५.७ | |
| १६ | नागपूर | नागपूर | ७०३९ | ७०३९ | ५४८५ | ७७.९ | ६ |
| १७ | नागपूर | गोंदिया | ११६२५ | ७७७८ | ५९४१ | ७६.४ | ९ |
| १८ | नागपूर | वर्धा | ५६३२ | ५६३२ | ४२१८ | ७४.९ | १० |
| १९ | नागपूर | भंडारा | ११०७५ | १०६१४ | ७३७९ | ६९.५ | १६ |
| २० | नागपूर | गडचिरोली | ५८८० | ५७७७ | ३५९२ | ६२.२ | २१ |
| २१ | नागपूर | चंद्रपूर | १८८७३ | १५५८५ | ७७७० | ४९.९ | ३० |
| नागपूर विभाग | | | ६०१२४ | ५२४२५ | ३४३८५ | ६५.६ | |
| २२ | अमरावती | बुलढाणा | १०९११ | १०८७८ | ७३०८ | ६७.२ | १९ |
| २३ | अमरावती | अमरावती | १०२९२ | १०२२९ | ६८६० | ६७.१ | २० |
| २४ | अमरावती | यवतमाळ | १२३४१ | १२२३२ | ७६०० | ६२.१ | २२ |
| २५ | अमरावती | अकोला | १२४०२ | १२१८८ | ६८४५ | ५६.२ | २७ |
| २६ | अमरावती | वाशिम | ७१६६ | ७१६५ | ४००८ | ५५.९ | २८ |
| अमरावती विभाग | | | ५३११२ | ७९९६२ | ४६९१३ | ५८.७ | |
| २७ | औरंगाबाद | हिंगोली | ६७२८ | ६४१५ | ४७३९ | ७३.९ | ११ |
| २८ | औरंगाबाद | परभणी | १३८४१ | १३५७४ | ९७१२ | ७१.५ | १३ |
| २९ | औरंगाबाद | लातूर | १९३८५ | १८८३८ | ११६१८ | ६१.७ | २४ |
| ३० | औरंगाबाद | बीड | १५७३५ | १३२७७ | ७१७० | ५४.० | २९ |
| ३१ | औरंगाबाद | जालना | ९००७ | ७९६१ | ३७३७ | ४६.९ | ३१ |
| ३२ | औरंगाबाद | नांदेड | १६३०० | १३८७६ | ६१९० | ४४.६ | ३२ |
| ३३ | औरंगाबाद | औरंगाबाद | १५३५६ | १५०३८ | ६६९२ | ४४.५ | ३३ |
| ३४ | औरंगाबाद | उस्मानाबद | १४४४७ | १४४४४ | ५०१४ | ३४.७ | ३४ |
| औरंगाबाद विभाग | | | ११०७९९ | १०३४२३ | ५४८७२ | ५३.१ | |
| एकूण | | | ३३९३७६ | ३२२४८० | २०३६८४ | ६३.२ | |

# शबरी आवास योजना सन २०१६-१७ ते २०१९-२०
## संचित प्रगती अहवाल - ३० जून २०२१

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर घरकुले | पूर्ण झालेली घरकुले संख्या | पूर्ण झालेली घरकुले टक्केवारी % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोकण | सिंधुदुर्ग | २२ | २२ | २२ | १००.० | १ |
| २ | कोकण | ठाणे | १६३३ | १६३१ | १५६५ | ९६.० | ३ |
| ३ | कोकण | रायगड | १२२३ | १२२१ | ११४४ | ९३.७ | ४ |
| ४ | कोकण | रत्नागिरी | १७९ | १७९ | १४७ | ८२.१ | १० |
| ५ | कोकण | पालघर | ५३५८ | ५३३७ | ४३०९ | ८०.७ | १२ |
| कोकण विभाग | | | ८४१५ | ८३९० | ७१८७ | ८५.७ | |
| ६ | पुणे | कोल्हापूर | ३० | १३ | १३ | १००.० | २ |
| ७ | पुणे | सोलापूर | ६०१ | ५७३ | ५२० | ९०.८ | ५ |
| ८ | पुणे | सांगली | ६० | ४८ | ४१ | ८५.४ | ७ |
| ९ | पुणे | पुणे | २१९१ | २१८२ | १७४५ | ८०.० | १३ |
| १० | पुणे | सातारा | १२७ | १२१ | ९२ | ७६.० | १४ |
| पुणे विभाग | | | ३००९ | २९३७ | २४११ | ८२.१ | |
| ११ | नाशिक | धुळे | ६३७० | ६३४६ | ५३२५ | ८३.९ | ८ |
| १२ | नाशिक | अहमदनगर | ३४५३ | ३४५३ | २६१९ | ७५.८ | १५ |
| १३ | नाशिक | नंदूरबार | ७५७८ | ७५५९ | ५५२३ | ७३.१ | १७ |
| १४ | नाशिक | जळगाव | ४६१५ | ४६१५ | ३३११ | ७१.७ | १८ |
| १५ | नाशिक | नाशिक | ९७३० | ९५६२ | ५६०८ | ५८.६ | २९ |
| नाशिक विभाग | | | ३१७४६ | ३१५३५ | २२३८६ | ७१.० | |
| १६ | औरंगाबाद | हिंगोली | २९८२ | २८७७ | २४९८ | ८६.८ | ६ |
| १७ | औरंगाबाद | लातूर | ५८० | ४३६ | ३०८ | ७०.६ | १९ |
| १८ | औरंगाबाद | नांदेड | १०९४ | १०४१ | ७१३ | ६८.५ | २१ |
| १९ | औरंगाबाद | जालना | ४६३ | ४४० | २९८ | ६७.७ | २३ |
| २० | औरंगाबाद | औरंगाबाद | २३५७ | २२७३ | १४९६ | ६५.८ | २४ |
| २१ | औरंगाबाद | उस्मानाबद | १९० | १८२ | ११९ | ६५.४ | २५ |
| २२ | औरंगाबाद | बीड | ५९७ | ४११ | १९९ | ४८.४ | ३२ |
| २३ | औरंगाबाद | परभणी | ६४६ | ६४४ | १५४ | २३.९ | ३४ |
| औरंगाबाद विभाग | | | ८९०९ | ८३०४ | ५७८५ | ६९.७ | |
| २४ | अमरावती | बुलढाणा | ९०८ | ९०७ | ६७२ | ७४.१ | १६ |
| २५ | अमरावती | यवतमाळ | ४६९६ | ४६९८ | ३२४७ | ६९.१ | २० |
| २६ | अमरावती | अमरावती | ३६९८ | ३६०६ | २४६० | ६८.२ | २२ |
| २७ | अमरावती | वाशिम | ४८२ | ४८१ | २८८ | ५९.९ | २८ |
| २८ | अमरावती | अकोला | १४२२ | ११०४ | ६२९ | ५७.० | ३१ |
| अमरावती विभाग | | | ११२०६ | १०७६७ | १२०३९ | ६७.८ | |
| २९ | नागपूर | नागपूर | २१७३ | २१७३ | १८०१ | ८२.९ | ९ |
| ३० | नागपूर | गोंदिया | १८३५ | १७७२ | १४३२ | ८०.८ | ११ |
| ३१ | नागपूर | वर्धा | २६०२ | २६०२ | १६७३ | ६४.३ | २६ |
| ३२ | नागपूर | चंद्रपूर | ५१८२ | ५०२० | ३०२२ | ६०.२ | २७ |
| ३३ | नागपूर | गडचिरोली | ३९०७ | ३७४० | २१८५ | ५८.४ | ३० |
| ३४ | नागपूर | भंडारा | ४३११ | ४१७७ | १५८० | ३७.८ | ३३ |
| नागपूर विभाग | | | २००१० | १९४८४ | ११६९३ | ६०.० | |
| एकूण | | | ८३२९५ | ८१४४६ | ५६७५८ | ६९.७ | |

# पारधी आवास योजना सन २०१६-१७ ते २०१८-१९

## संचित प्रगती अहवाल - ३० जून २०२१

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर घरकुले | पूर्ण झालेली घरकुले | | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | संख्या | टक्केवारी % | |
| १ | नाशिक | धुळे | ३४९ | ३४८ | ३२५ | ९३.४ | ५ |
| २ | नाशिक | जळगाव | २५७ | २१६ | १५६ | ७२.२ | १६ |
| ३ | नाशिक | नाशिक | ५६ | २८ | १९ | ६७.९ | १८ |
| ४ | नाशिक | अहमदनगर | १४१ | १४१ | ८९ | ६३.१ | २१ |
| नाशिक विभाग | | | ८१३ | ७३३ | ५८९ | ८०.४ | |
| ५ | पुणे | कोल्हापूर | ७ | ७ | ७ | १००.० | १ |
| ६ | पुणे | सातारा | २० | १४ | १३ | ९२.९ | ६ |
| ७ | पुणे | सोलापूर | १४४ | ११५ | १०० | ८७.० | ९ |
| ८ | पुणे | सांगली | २८ | १४ | १२ | ८५.७ | ११ |
| ९ | पुणे | पुणे | १२२ | ९१ | ५२ | ५७.१ | २२ |
| पुणे विभाग | | | ३२१ | २४१ | १८४ | ७६.३ | |
| १० | नागपूर | चंद्रपूर | २५ | ९ | ८ | ८८.९ | ८ |
| ११ | नागपूर | वर्धा | ५० | ५० | ४१ | ८२.० | १३ |
| १२ | नागपूर | नागपूर | ४८ | ४६ | ३१ | ६७.४ | १९ |
| नागपूर विभाग | | | १२३ | १०५ | ८० | ७६.२ | |
| १३ | अमरावती | वाशिम | ३८ | ३७ | ३४ | ९१.९ | ७ |
| १४ | अमरावती | अमरावती | २६४ | २६२ | २१६ | ८२.४ | १२ |
| १५ | अमरावती | बुलढाणा | २२२ | २२२ | १८२ | ८२.० | १४ |
| १६ | अमरावती | अकोला | २१४ | २१४ | १६३ | ७६.२ | १५ |
| १७ | अमरावती | यवतमाळ | ५१९ | ५१४ | २८४ | ५५.३ | २३ |
| अमरावती विभाग | | | १२५७ | १२४९ | ८७९ | ७०.४ | |
| १८ | औरंगाबाद | हिंगोली | २२ | २२ | २२ | १००.० | ४ |
| १९ | औरंगाबाद | लातूर | १२ | ८ | ८ | १००.० | ३ |
| २० | औरंगाबाद | नांदेड | १६ | ८ | ८ | १००.० | २ |
| २१ | औरंगाबाद | परभणी | ३६ | ३६ | ३१ | ८६.१ | १० |
| २२ | औरंगाबाद | उस्मानाबद | १५० | १५० | १०३ | ६८.७ | १७ |
| २३ | औरंगाबाद | बीड | ६१ | ५५ | ३६ | ६५.५ | २० |
| २४ | औरंगाबाद | औरंगाबाद | ४२ | ३५ | १८ | ५१.४ | २४ |
| २५ | औरंगाबाद | जालना | २७ | २१ | ६ | २८.६ | २५ |
| औरंगाबाद विभाग | | | ३६६ | ३३५ | २३२ | ६९.३ | |
| एकूण | | | २८८० | २६६३ | १९६४ | ७३.८ | |

## आदिम आवास योजना सन २०१६-१७ ते २०१९-२०
## संचित प्रगती अहवाल - ३० जून २०२१

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर घरकुले | पूर्ण झालेली घरकुले | | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | संख्या | टक्केवारी % | |
| १ | कोकण | सिंधुदुर्ग | ५३ | ४९ | ४८ | ९८.० | १ |
| २ | कोकण | रायगड | ९१६ | ९१२ | ८५२ | ९३.४ | २ |
| ३ | कोकण | ठाणे | ८४६ | ८४५ | ७८८ | ९३.३ | ३ |
| ४ | कोकण | पालघर | ६११ | ६११ | ३८६ | ६३.२ | ६ |
| कोकण विभाग | | | २४२६ | २४१७ | २०७४ | ८५.८ | |
| ५ | नागपूर | वर्धा | २६ | २६ | २१ | ८०.८ | ४ |
| ६ | नागपूर | गडचिरोली | १६९० | १४६७ | १०३७ | ७०.७ | ५ |
| ७ | नागपूर | चंद्रपूर | ६३८ | ३७७ | १८९ | ५०.१ | ८ |
| ८ | नागपूर | नागपूर | २२२ | ० | ० | ०.० | ११ |
| नागपूर विभाग | | | २५७६ | १८७० | १२४७ | ६६.७ | |
| ९ | अमरावती | यवतमाळ | १५५४ | १५५४ | ९७९ | ६३.० | ७ |
| अमरावती विभाग | | | १५५४ | १५५४ | ९७९ | ६३.० | |
| १० | औरंगाबाद | नांदेड | ४१९ | १७९ | ६४ | ३५.८ | ९ |
| औरंगाबाद विभाग | | | ४१९ | १७९ | ६४ | ३५.८ | |
| ११ | नाशिक | नाशिक | १२ | १२ | ० | ०.० | १० |
| नाशिक विभाग | | | १२ | १२ | ० | ०.० | |
| १२ | पुणे | पुणे | १९ | ० | ० | ० | १२ |
| पुणे विभाग | | | १९ | ० | ० | ०.० | |
| एकूण | | | ७००६ | ६०३२ | ४३६४ | ७२.३ | |

## यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना
## संचित प्रगती अहवाल - ३० जून २०२१

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर घरकुले | पूर्ण झालेली घरकुले | | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | संख्या | टक्केवारी % | |
| १ | अमरावती | अमरावती | ४५ | २५ | ११ | ४४.० | ४ |
| २ | अमरावती | यवतमाळ | ८० | २७ | २० | ७४.१ | २ |
| अमरावती विभाग | | | १२५ | ५२ | ३१ | ०.० | |
| ३ | औरंगाबाद | उस्मानाबाद | ३६७ | ३१३ | १३० | ४१.५ | ५ |
| ४ | औरंगाबाद | लातूर | १० | १० | ० | ०.० | ७ |
| औरंगाबाद विभाग | | | ३७७ | ३२३ | १३० | ०.० | |
| ५ | नागपूर | गोंदिया | २० | २० | २० | १००.० | १ |
| नागपूर विभाग | | | २० | २० | २० | ०.० | |
| ६ | नाशिक | अहमदनगर | २० | ० | ० | ०.० | ६ |
| नाशिक विभाग | | | २० | ० | ० | ०.० | |
| ७ | पुणे | सोलापूर | ४ | ४ | २ | ५०.० | ३ |
| पुणे विभाग | | | ४ | ४ | २ | ०.० | |
| एकूण | | | ५४६ | ३९९ | १८३ | ४५.९ | |

# घरकुलामुळे परिवाराला मिळाली सुरक्षितता

चंद्रपूर जिल्ह्यात मुल तालुक्यातील मरोडा ग्रामपंचायतीमध्ये श्रीमती योगिता अरूण गजबिये या अनुसुचित जातीच्या विधवा महिला एका कच्च्या कुडा मातीच्या घरात त्यांच्या मुलांसह रहात होत्या. अत्यंत गरिब परिस्थितीत त्यांचा परिवार त्या कच्च्या व कमकुवत घरात एखाद्या शरणार्थी सारखा आपले जीवन जगत होता. घर फक्त नावाला होते, घरात तशा कोणत्याही सुख सुविधा नव्हत्या, पावसाळ्यात जेवढा पाऊस घराबाहेर पडायचा तेवढाच घरात, हिवाळ्यात घराला मजबूत भिंती नसल्यामुळे थंडीचा त्रास, ऊन्हाळ्यात उष्णतेच्या मरणाच्या झळा म्हणून घरापेक्षा झाडाखाली राहणे मुलं पसंत करतं, एवढे कष्ट काय कमी होते तर त्या अहोरात्र डासांचा त्रास त्यामुळे मुलांची सतत चिडचिड सुरू होती. पण सांगणार तर कोणाला अशा या बिकट परिस्थितीमुळे या घरात राहण्याशिवाय पर्याय नव्हता. घरात राहायला पुरेशी जागा नाही म्हटल्यावर घरात शौचालय नाही. कोणी नातेवाईक, पाहुणा येवो की, घरच्यांना पहाटे लवकर उठून शौचालयाकरीता लांब गावा बाहेर शेतात जावे लागत होते. पावसाळ्यात आणि रात्रीच्या वेळेस उघड्यावर शौचालयाला जाणे म्हणजे जीव आणि इज्जतीचा कायमच धोका राहायचा. अशा या परिस्थितीमुळे त्यांना व त्यांच्या मुलांना कायम असुरक्षितेत आपले जीवन जगावे लागत होते.

मुलांना त्यांचे वैयक्तिक स्वातंत्र्य व सुरक्षितता देण्यासाठी श्रीमती योगिता अरूण गजबिये यांनी स्वतःचे पक्के घर बांधण्याचा निर्धार केला. पण नशिबाला आलेली साता जन्माचे दारिद्र आणि साता जन्माची सात देणाऱ्या नवऱ्याने अर्धातच सोडलेली साथ अशा परिस्थितीत एका विधवा महिलेने स्वतःच्या पक्क्या घराचे स्वप्न पूर्ण करणे म्हणजे आकाशाला गवसणी घालण्याचा प्रकार होता. त्यातच त्यांच्याकडे पुरेसा पैसा आणि नातेवाईकांची मदत नाही, त्यामुळे त्या सतत चिंतेत राहत होत्या.

श्रीमती योगिता अरूण गजबिये यांनी पैशाची कमतरता आणि आभाळभर कष्टाचा डोंगर असतांनाही त्यांनी स्वतःचे घर बांधायच्या स्वप्नाला थांबा न देता प्रयत्न सुरूच ठेवले. म्हणतात ना "प्रयत्नार्थी परमेश्वर" तसेच काही यांच्या बाबतीत घडले. श्रीमती योगिता अरूण गजबिये यांना ग्रामपंचायत कार्यालयाकडून प्रधानमंत्री आवास योजनेबाबत माहिती देण्यात आली. त्यानुसार ग्रामपंचायतीमार्फत त्यांचा घरकुलाचा प्रस्ताव मंजूरीसाठी शासनाकडे पाठविण्यात आला. काही कालावधीतच सन २०१६-१७ मध्ये त्यांचे घरकुल मंजूर झाले आणि त्यांना पहिला हप्ताही प्राप्त झाला. त्यांना मिळालेल्या पैशातून त्यांनी घरकुल बांधकामाला सूरूवात केली. त्यांचे घराचे बांधकाम करत असतांना त्यांनी स्वतः मजूरीचे काम केल्यामुळे त्या महात्मा गांधी रोजगार हमी योजने अंतर्गत रक्कम रू. १६,४००/- तर प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधून रक्कम रू.१,३०,०००/- मिळाले. त्यामुळे श्रीमती योगिता अरूण गजबिये यांनी त्यांच्या कच्च्या घराचे रूपांतर पक्क्या घरात केले. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मुळे त्यांचे पक्क्या घराचे स्वप्न पूर्ण झाले.

श्रीमती योगिता अरूण गजबिये यांना घरकुलासह महात्मा गांधी रोजगार हमी योजने मधून रोजगार व स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण मधून शौचालयासाठी रक्कम रू. १२,०००/- चा लाभ मिळाला आहे. आज त्या त्यांच्या स्वतःच्या पक्क्या घरात मुलांसह आनंदाने व सुरक्षितपणे राहत आहेत. त्यांना घरासह रोजगार मिळाल्याने त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारलेली आहे. याबद्दल त्यांनी शासनाचे आभार मानले आहे. असून घरकुलामुळे परिवाराला सुरक्षितता मिळाली असल्याचे सांगितले.





# बक्षिस पत्राव्दारे भूमीहीन लाभार्थ्यांना जागा

महा आवास अभियान-ग्रामीणच्या प्रगतीचा आढावा मा. मंत्री, ग्राम विकास यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येतो. अशा वेळी नेहमी अमरावती जिल्ह्याची प्रगती असमाधानकारक असल्याचा शेरा राज्य स्तरावरून देण्यात येतो. ही खंत कुठेतरी मा.पालकमंत्री यांना अस्वस्थ करत होती.

मा.मंत्री, महिला व बाल कल्याण तथा अमरावती जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती यशोमती ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली व अमरावतीचे जिल्हाधिकारी श्री. शैलेश नवल यांच्या प्रमुख उपस्थितीत महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत विविध ग्रामीण आवास योजनांचा आढावा घेण्यात आला. या बैठकीला जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी व इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

महा आवास अभियान-ग्रामीण मध्ये अमरावती जिल्ह्याच्या प्रगतीचा घसरता आलेख लक्षात घेता व अमरावती जिल्ह्याची अभियानातील प्रगती उंचावण्यासाठी मा. पालकमंत्री, श्रीमती यशोमती ठाकुर व जिल्हाधिकारी, श्री. शैलेश नवल यांनी ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासंबंधित सर्व अधिकारी/कर्मचारी यांची बैठक घेतली. या बैठकीमध्ये सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा तालुकानिहाय आढावा घेण्यात आला. तसेच महा आवास अभियानातील १० उपक्रमाचा आढावा घेण्यात आला. या बैठकी दरम्यान असे निदर्शनास आले की बहुतांश लाभार्थ्यांचे घरकुल मंजूर असतांनाही जागे अभावी बहुतांश लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देण्यात आला नाही.

भूमीहीन लाभार्थ्यांना जागेची उपलब्धता करणे, हा अभियानातील उपक्रम असून यामुळे आपण मागे पडता कामा नये यासाठी मा. पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांनी जागेच्या उपलब्धतेसाठी बैठकीला उपस्थितीत सर्वांशी चर्चा केली. त्यावेळी असे लक्षात आले की, महसूल विभागाच्या काही अटी शर्ती मुळे कमी क्षेत्रफळ असलेल्या जागेची नोंदणी करता येत नसल्याने बहुतांश लाभार्थ्यांचे घरकुलाचे स्वप्न जागे अभावी पूर्ण होवू शकत नाही.

या करीता जिल्हाधिकारी श्री. शैलेश नवल यांनी विविध ग्रामीण आवास योजने अंतर्गत घरकुलास पात्र लाभार्थ्यांना स्वमालकीची जागा नसल्याने घरकुलाचा लाभ मिळत नाही, अशा लाभार्थ्यांना महसूल व वन विभागाच्या ३१ मार्च २०१६ च्या अधिसूचनेनुसार  निवासी मालमत्ता ही पती, पत्नी, नातू, नात किंवा मय्यत झालेल्या मुलाची पत्नी अशा रक्तातील नात्यामध्ये बक्षीस पत्राच्या दस्तावर १ हजार रूपये इतकी फी देवून अधिकृत नोंदणी करता येईल असे सांगितले. त्याकरीता अमरावती जिल्ह्यामध्ये ४,७१८ भूमिहीन लाभार्थ्यांना रक्तातील नात्यामध्ये बक्षिसपत्रा व्दारे जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसे आदेश संबंधित विभागाना श्री. शैलेश नवल यांनी दिले. भूमीहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी जागेची उपलब्धता प्राधान्याने देण्यात यावी, तसेच याकामी दिरंगाई करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, अशा सूचना श्री. शैलेश नवल यांनी उपस्थितांना दिल्या.

जिल्हाधिकारी यांच्या या निर्णयाचे स्वागत करत, सर्वांचे घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी व भूमीहीन लाभार्थ्यांना जागा उपब्ध करून देण्यासाठी जिल्ह्यात मोहिम राबविण्याचे आदेश मा. मंत्री, महिला व बालकल्याण श्रीमती यशोमती ठाकून यांनी उपस्थितांना दिले. त्यानुसार जिल्ह्यात अंमलबजावणीला सुरूवात झाल्यामुळे आज अमरावती जिल्ह्यातील बेघर, भूमीहीन लाभार्थ्यांचे घरकुलाचे स्वप्न पूर्ण होत आहे. त्यांच्या निर्णयामुळे ग्रामीण आवास योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.





# दिव्यांग मुलाच्या आईला मिळाले घरकुल

आई ही जगातली इतकी मोठी हस्ती आहे, जिच्या घामाच्या एका थेंबाची सुध्दा परफेड कोणताच मुलगा कोणत्याही जन्मी करू शकत नाही.

हिंगोली जिल्ह्यातील औंढा तालुक्यातील पिंपाळदरी येथील श्रीमती अन्नपूर्णा धुळे ह्या आपल्या दोन दिव्यांग मुलांसह जीवन व्यतीत करत आहेत. आता त्या वयोवृद्ध होत असल्यामुळे त्याना आपल्या मुलांची चिंता सतावत आहे. दोन्ही मुले दिव्यांग असल्याने त्यांच्या उदरनिर्वाहाची संपूर्ण जवाबदारी श्रीमती अन्नपूर्णा धुळे यांच्यावर आहे. मिळेल ते काम करून त्या आपल्या मुलांचा सांभाळ करीत आहेत, कधी नाली काढणे, कधी मजूरी करणे, रोजंदारी करणे व इतर कामे त्यांना म्हातार वयात करावे लागत आहे. लग्नानंतर दोन दिव्यांग मुलांना जन्म दिल्याने त्याच्यावर अनेक वाईट प्रसंग आले परंतु न खचता त्या आपल्या मुलांच्या पोट पाण्याचा व औषधीचा प्रश्न मार्गी लावीत होत्या. कोरोना महामारीच्या काळात मात्र त्याना कामे मिळने बंद झाल्यामुळे त्यांच्यापुढे मोठे आर्थिक संकट उभे राहिले. हाताला काम नाही तर पोटाची भूक कशी मिटवायची, पण म्हणतात ना 'देव तारी, त्याला कोण मारी' त्यांची ही परिस्थिती पाहून त्यांना अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी कोरोना संकटात मदत करून आपली सामाजिक बांधीलकी जपली.

श्रीमती अन्नपूर्णा धुळे यांना उदरनिर्वाहाच्या अडचणी सोबत आणखी अडचण होती ती त्यांच्या राहात्या घराची, त्या राहत असलेल्या कुडाच्या झोपडीची अत्यंत दयनीय अवस्था झाली होती. पण मुलांसाठी त्या जराही न डगमगता खंबीरपणे आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह करतात, हे फक्त एक आईच करू शकते.

सामाजिक संस्था व इतर प्रसार माध्यमातून श्रीमती अन्नपूर्णा धुळे यांच्या विषयीच्या बातम्या जनमाणसापर्यंत पोहोचण्यास सुरूवात झाली, त्यांना तशी मदतही मिळाली. मग या कामात शासन कसे मागे राहणार, ही बातमी जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. धनवंतकुमार माळी यांना कळताच, त्यांनी त्या महिलेला शासकीय घरकुल योजनेतून घरकुल का मिळाले नाही? या बद्दल पंचायत समितीकडे चौकशी केली. चौकशीतून असे लक्षात आले की श्रीमती अन्नपूर्णा धुळे यांचे जात प्रमाणपत्र तसेच उत्पन्न प्रमाणपत्र काढलेले नाही. याकामी श्री.धनवंत कुमार माळी हे प्रत्यक्षात श्रीमती अन्नपूर्णा धुळे यांचेकडे गेले आणि त्यांना आवश्यक प्रमाण पत्र काढण्याची प्रक्रिया सुरू केली. याकामी पंचायत समितीचे विस्तार अधिकारी श्री. बोंढारे यांनी अथक परिश्रम घेवून अधिकाऱ्यांच्या मदतीने अडचणी सोडवत त्यांनी कागदपत्राची पूर्तता केली. एवढेच नाही तर त्यांचा घरकुलचा प्रस्ताव जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा हिंगोली यांच्याकडे दाखल करून तत्काळ त्यांना रमाई योजनेतून घरकुल मंजूर केले. अशा प्रकारे श्रीमती अन्नपूर्णा धुळे यांना हक्काचे घरकुल मंजूर करून पहिला हप्ता देण्यात आला. तसेच बांधकामाची पुढील कार्यवाही ग्रामीण गृहनिर्माण अभियंता श्री.कोकडवार, श्री. जाधव व श्री. थोरात यांचे मार्फत सुरू करण्यात आली आहे.

गोर गरिबांना हक्काचे घरकुल मिळावे यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. राधा विनोद शर्मा व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. अनुप शेंगुलवार यांचे मार्गदर्शनाखाली व उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. धनवंतकुमार माळी, गट विकास अधिकारी श्री.मनोहर खिल्लारे, श्री.जगदीश शाहू, औंढा तहसीलदार, डॉ.कृष्णा कानगुले यांनी वेळो वेळी मार्गदर्शन व सहकार्य केले. यामुळे दिव्यांग मुलांच्या आईला घरकुल मिळाले आहे.





# ई-गृहप्रवेश म्हणजे लाभार्थ्यांसाठी स्वप्नपुर्ती सोहळा

जळगाव जिल्ह्यातील मोहाडी येथील रमाई आवास योजनेचे लाभार्थी श्री. सुकलाल मधुकर वाघ यांचा गृहप्रवेश कार्यक्रम पार पडला.

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण आवास योजनांची अंमलबजावणी गतिमान करणे व त्यामध्ये गुणवत्ता आणणेसाठी २० नोव्हेंबर, २०२० ते ०५ जून, २०२१ या कालावधीत राज्यात महा आवास अभियान ग्रामीण राबविण्यात आले. या अभियानातंर्गत बांधण्यात आलेल्या घरकुलांचा ई-गृहप्रवेश राज्याचे मा.मुख्यमंत्री, श्री. उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या शुभहस्ते दिनांक १५ जून, २०२१ रोजी सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे संपन्न झाला. यावेळी मा.मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरुपात पाच लाभार्थ्यांना घराची चावी देण्यात आली. तर या कार्यक्रमात जळगांव जिल्ह्यातील मोहाडी येथील रमाई आवास योजनेचे लाभार्थी श्री. सुकलाल मधुकर वाघ यांचा ई-गृहप्रवेश पार पडला. यावेळी गटविकास अधिकारी श्री. सोनवणे यांच्या हस्ते फीत कापून श्री.सुकलाल व सौ. रत्ना वाघ यांना घराची चावी व वृक्ष देऊन त्यांना घराचा ताबा देण्यात आला.

या कार्यक्रमास जळगांव येथे जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा परिषद अध्यक्षा श्रीमती रंजनाताई पाटील, जिल्हाधिकारी श्री.अभिजित राऊत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. बी. एन पाटील, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री. डिगंबर लोखंडे यांच्यासह विविध योजनांचे लाभार्थी उपस्थित होते. तर मुक्ताईनगर येथून मा. खासदार श्रीमती रक्षाताई खडसे तसेच प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणाहून मा. आमदार व पंचायत समित्यांचे सभापती ऑनलाईन उपस्थित होते. या सर्वांच्या उपस्थितीत श्री. सुकलाल मधुकर वाघ यांच्या गृहप्रवेशाचे थेट प्रक्षेपण प्रसारित करण्यात आल्याने श्री. सुकला वाघ व सौ. रत्ना वाघ यांनी शासन व प्रशासनाचे आभार मानले आहे. इतका भव्यदिव्य गृहप्रवेश आम्ही आमच्या पुढील चार पिढ्यातही करू शकणार नाही, हा ई-गृहप्रवेश कार्यक्रम म्हणजे आमच्यासाठी स्वप्नपूर्ती सोहळा असल्याची प्रतिक्रिया वाघ दाम्पत्याने दिली.

श्री. सुकलाल वाघ हे मोहाडी गावात आपल्या कुटुंबा सोबत अनेक वर्षापासून भाड्याच्या घरात राहत होते. शेती कामातून त्यांचा व त्यांच्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह चालला होता. अशा या बेताच्या परिस्थितीत स्वत:च्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांची कायम धडपड सूरू होती. अशातच राज्यात महा आवास अभियान-ग्रामीण राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला. यामुळे श्री. सुकलाल वाघ यांना त्यांच्या गृहप्राप्तीचा मार्ग सापडला. त्यांनी थोडाही विलंब न करता ग्रांमपंचायत कार्यलयाकडे धाव घेतली व त्यांच्या घरकुलाचा प्रस्ताव मंजूरीसाठी पाठविण्यात आला. अभियान कालावधीत सर्व कामे कालमर्यादेत करावयाची असल्याने श्री. सुकलाल वाघ यांच्या घरकुलाच्या प्रस्तावाल रमाई आवास योजनेतून तात्काळ मंजूरी व पहिल्या हप्ता वितरीत करण्यात आला. त्यांना मिळालेल्या अर्थसहाय्यातून घर बांधकामाला सूरूवात केली. बघता बघता घरकुलाचे बांधकाम आणि वाघ दाम्पत्यांचे घरकुलाचे स्वप्न पूर्ण झाले. याबद्दल मोहाडी ग्रामपंचायतीचे सर्व पदाधिकारी, पंचायत समिती, जिल्हा परिषदेचे अधिकारी यांनी सहकार्य केल्यामुळे सौ. रत्ना वाघ यांनी शासन आणि प्रशासनाचे यावेळी आभार मानले. तसेच महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत रमाई आवास योजनेत घरकुल पूर्ण झाले आणि ई-गृहप्रवेश झाल्याचा आनंद असल्याचे त्यांनी सांगितले. आज वाघ दाम्पत्य त्यांच्या स्वतःच्या घरात आनंदाने राहता आहे.





# पर्यावरण पुरक डेमो हाऊसची निर्मिती

घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी व लाभार्थ्यांना मार्गदर्शक ठरण्यासाठी राज्यात महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत सर्व पंचायत समिती आवारामध्ये डेमो हाऊसेसचे बांधकाम करण्यात येत आहे. डेमो हाऊसेसमुळे लाभार्थ्यांना कमी खर्चात, त्यांच्या स्थानिक भौगोलीक परिस्थीतीशी अनुरूप व भूकंप रोधक घरकुल बांधकामाचे मार्गदर्शन मिळणार आहे. तसे पहायला गले तर बांधकाम क्षेत्रात कित्येक नवनवीन प्रयोग करण्यात येतात. 'टाकाऊ मधून टिकाऊ' या वाक्याला साजेशा अशा एक पर्यावरण पुरक प्रयोग डेमो हाऊस बांधकाम करतांना कागल पंचायत समिती येथे करण्यात आला आहे.

कोल्हापूर जिल्हातील कागल पंचायत समिती आवारात डेमो हाऊसचे बांधकाम सुरू आहे. पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री. सुशिल संसारे यांच्या संकल्पनेतून डेमो हाऊस मध्ये शौचालयाचे बांधकाम विटा ऐवजी प्लास्टिक बॉटल्सचा वापर करून करण्यात येत आहे. हा पर्यावरण पुरक अभिनव उपक्रम सर्वत्र चर्चेचा विषय ठरतो आहे.

आज प्लास्टिक हा आपल्या दैनंदिन जीवनातील महत्वाचा घटक झाला असून जवळ जवळ सर्वच ठिकाणी प्लास्टिकचा मोठ्या प्रमाणात वापर होतो आहे. प्लास्टिक सारख्या अविघटनशिल घटकामुळे पर्यावरणाची व जनावरांची मोठ्या प्रमाणात हानी होते. तरीही प्लास्टिकचा वापर काही केल्या कमी होत नाही, 'कळतयं, पण वळत नाही'!

प्लास्टिक मुळे होणारी पर्यावरणाची हानी रोखण्यासाठी कागलचे पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, श्री. सुशिल संसारे यांनी वापरात टाकाऊ प्लास्टिक बॉटल्समध्ये इतरही प्लास्टिक कचरा जसे - बिस्कीट रॅपर, गिफ्ट रॅपर, प्लास्टिक पिशवी इ. स्वच्छ व कोरडे करून भरला. या कामाला गती येण्यासाठी श्री. सुशिल संसारे यांनी त्यांनी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या सर्व शाळेंच्या केंद्र प्रमुख व मुख्याध्यापकांची बैठक घेतली. या बैठकीमध्ये प्लास्टिक बॉटल्समध्ये प्लास्टिकचा कचरा भरण्याचे प्रात्यक्षिक उपस्थितांना दिले. त्यासोबतच प्रत्येक जिल्हा परिषद शाळेला १० प्लास्टिक बॉटल्स विद्यार्थ्यांमार्फत भरून घेण्याचा उपक्रम दिला होता. त्यामुळे गावातील जाळला जाणारा प्लास्टिक कचरा आता याकामी उपयोगात आला. बघता बघता गावातील प्लास्टिकचा कचरा कमी झाला आणि विद्यार्थ्यांनाही पर्यावरणाची गोडी लागून प्लास्टिक निर्मूलन कसे करावे याची माहिती मिळाली. याकामात विद्यार्थ्यांना गोडी निर्माण झाल्याने दिलेल्या उद्देशापेक्षा जास्त काम झाले.

सर्व जिल्हा परिषदेंच्या शाळांमध्ये हा उपक्रम राबविण्यात आल्यामुळे पंचायत समितीला मोठ्या प्रमाणात कचऱ्याने भरलेल्या प्लास्टिक बॉटल्स जमा झाल्यात. या बॉटल्सचा वापर करून डेमो हाऊस मधील शौचालयाचे बांधकाम करण्यात येणार असल्याचे श्री. सुशिल संसारे यांनी जेव्हा सांगितले, तेव्हा सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला. तेव्हा त्यांनी या उपक्रमाबाबत सर्वांना समजावून सांगितले की, शौचालय बांधकामाकरीता ८०० ते १००० प्लास्टिक बॉटल्स लागतील. तसेच हा उपक्रम तालुक्यातील इतर बांधकामासाठी करणार असल्याचे श्री. सुशिल संसारे यांनी सांगितले.

श्री. सुशिल संसारे यांनी प्लास्टिक बॉटल्सचा वापर करून प्रायोगिक तत्वावर शौचालयाचे बांधकाम हाती घेतले आहे. त्यांच्या या पर्यावरण पुरक कामाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत असून हा उपक्रम राबविण्यासाठी पंचायत समितीच्या सभापती श्रीमती पूनम मगदूम, उपसभापती श्रीमती अंजना सुतार, सर्व पंचायत समिती सदस्य, सहाय्यक गट विकास अधिकारी श्री. माळी, उप अभियंता श्री. चांदणे, शाखा अभियंता श्री. शेळके, गवंडी प्रशिक्षक श्री अविनाश सुतार व इतर पंचायत समितीचे अधिकारी/कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.





# शबरी आवास योजनेमुळे पक्क्या घराची स्वप्नपूर्ती

ग्रामीण भागातील जनतेला घरकुलांचा लाभ देण्यासाठी राज्यात विविध ग्रामीण आवास योजना राबविण्यात येतात. या योजनामुळे कित्येक गरीब, बेघर, भूमीहीन लोकांचे स्वतःच्या घराचे स्वप्न पूर्ण झाले आहे. याचेच एक उदाहरण म्हणजे शबरी आवास योजनेमुळे चिंचवली गावातील लाभार्थ्यांच्या पक्क्या घराची झालेली स्वप्नपूर्ती!

शबरी आवास योजनेंतर्गत अनु. जमातीतील बेघर व कच्चे घर असलेल्या गरजू कुटुंबाना लाभ देण्यात येतो. या योजनेंतर्गत ठाणे जिल्हा, भिवंडी तालुक्यातील पेसा क्षेत्रातील पेसा ग्रामपंचायत चिंचवली (कु) येथील श्री. बाळाराम लडकू गवारी यांना सन २०१८-१९ या वर्षी घरकुल मंजूर करण्यात आले. त्याचप्रमाणे श्री. बाळाराम लडकू गवारी यांचे बंधु श्री.कैलास लडकू गवारी यांचाही घरकुलाचा प्रस्ताव ग्रामपंचायत मार्फत पाठविण्यात आला होता. श्री.कैलास लडकू गवारे यांचा प्रस्तावही सन २०१९-२० या आर्थिक वर्षात शबरी घरकुल योजना अंतर्गत घरकुलासाठी मंजूर करण्यात आला. त्यामुळे दोन्ही भाऊ घरकुलास पात्र लाभार्थी यादीमध्ये समाविष्ट करण्यात आले.

या आधी श्री. बाळाराम लडकू गवारी व श्री.कैलास लडकू गवारी हे एका छोट्या व कच्च्या घरात वास्तव्य करत होते. एका लहान कच्च्या घरात दोन कुटुंब सोबत प्रत्येक लाभार्थ्यांचे तीन सदस्य, आई, वडील व भाऊ इतका मोठा परिवार वास्तव्यास होता. मोठा परिवार आणि छोटे घर यावर तोडगा म्हणून एका छोट्या घराचे दोन छोट्या घरात रूपांतर करून त्यामध्ये आई वडील राहत असत. जुन्या पध्दतीचे बांधकाम असलेले कच्चे घर असल्याने मोडकळीस आले होते. त्यामुळे पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात त्रासाला सामोरे जावे लागत होते. पावसाळा तोंडावर आली की, या छोट्या घरात मोठ्या कुटुंबा सोबत जीव मुठीत घेऊन दिवस पावसाळ्याचे दिवस काढावे लागत होते. त्यातच एक घरामध्ये दोन कुटुंब पावसाळ्यात झोपायला तर सोडा बसायलाही जागेची अडचण निर्माण होत होती. अशातच त्यांच्या परिवाराला साथ मिळाली ती शबरी आवास योजनेची, या योजनेमुळे त्यांचे पक्के घर निर्माण करण्याची आशा पल्लवीत झाली.

श्री. बाळाराम लडकू गवारी व त्यांचे बंधु श्री.कैलास लडकू गवारी हे दोन्ही घरकुल लाभार्थींना घरकुल मंजूर झाले. परंतु या लाभार्थीकडे दोन वेगळे घरकुल बांधण्याकरीता पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने त्यांच्यापुढे आता नव्याने जागेची अडचण निर्माण झाली. परंतु त्यांना महा आवास अभियान-ग्रामीण मधील नावीन्यपूर्ण उपक्रमांतर्गत बहुमजली इमारती बाबत माहिती मिळाली. परिणाम स्वरूपी या दोन्ही लाभार्थींनी एकत्र (G+१) घरकुल बांधण्याचे ठरविले. त्यानुसार घरकुल बांधकामास सुरूवात करण्यात आली. घरकुल बांधकाम करत असतांना घरातील सदस्यांनी मजूरीचे काम केल्याने मजूरीच्या खर्चात बचत तर झालीच पण त्यांना मनरेगा अंतर्गत मजूरांना मजूरी रक्कम रू. १८,५४०/- प्राप्त झाली. मनरेगा अंतर्गत मजूरीसाठी मिळालेली रक्कम व शबरी आवास योजने अंतर्गत मिळालेले अर्थसहाय्य रक्कम रू.१,२०,०००/- प्राप्त झाल्यामुळे या दोन्ही लाभार्थ्यांनी त्यांच्या घरकुलाचे बांधकाम अत्यंत चांगल्या पध्दतीचे केले आहे.

आज श्री. बाळाराम लडकू गवारी व श्री.कैलास लडकू गवारी हे दोघेही भाऊ आपल्या कुटुंबासह एका प्रशस्त व दर्जेदार घरात वास्तव करत आहे. याबद्दल त्यांनी त्यांचे मनोगत व्यक्त करतांना सांगितले की, शबरी आवास योजने अंतर्गत घरकुल मंजूर झाल्यामुळे आम्ही आमच्या स्वतःच्या वैयक्तिक घरकुलाचे (G+१) पध्दतीने बांधकाम करून केल्यामुळे आमचे पक्क्या घराचे स्वप्न पूर्ण झाले आहे. आमच्या स्वतःच्या स्वप्नातल्या घरात आम्ही आमच्या कुटुंबासह आनंदाने जीवन जगत आहोत. या योजनेमुळे आमचे घराचे स्वप्न पूर्ण झाले. याकरीता त्यांनी ग्रामपंचायत सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, पंचायत समिती व जिल्हा स्तरावरील अधिकारी व शासनाचे आभार मानले आहे.



# फोटो गॅलरी




विभागीय आयुक्त कार्यालय,




ई-गृहप्रवेश कार्यक्रम


राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण
ई-गृहप्रवेश कार्यक्रम
पंचायत समिती कागल.







सर्वसामान्य जनतेचे स्वप्न पूर्ण करणारे सरकार

# ८ लाख कुटुंबांना मिळाली घरकुले

**३ लाख २३ हजार लाभार्थ्यांनी केला गृहप्रवेश** | **मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले ग्रामविकास विभागाचे कौतुक**

मुंबई, दि. १५ (प्रतिनिधी) – महाआवास अभियानांतर्गत ८ लाख कुटुंबांच्या हक्काच्या घरकुलांचे बांधकाम करून महाविकास आघाडीने जोरदार कामगिरी केली आहे. शहरांबरोबर ग्रामीण भागातही लक्ष केंद्रित करतान आज ग्रामीण भागातील ४० लाख लोकांना निवारा देण्यात आला आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत यातील ३ लाख २३ हजार लाभार्थ्यांनी आज गृहप्रवेश केला. सुमारे ४ लाख ६८ हजार घरकुलांचे बांधकाम महिनाभरात पूर्ण होणार असून ग्रामविकास विभागाची ही कौतुकास्पद कामगिरी...



ग्रामविकासमंत्री हसन मुश्रीफ यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या कार्यक्रमात मुख्यमंत्री म्हणाले, मागील दीड वर्षापासून राज्य कोरोनाच्या संकटाशी लढत असताना आपण नागरिकांना घरात राहा, सुरक्षित राहा असे आवाहन करत होतो. परंतु घर नसलेल्यांनी घरात कसे राहायचे, भूमिहीनांनी घरात सुरक्षित कसे राहायचे हा प्रश्न होता, ज्याचे उत्तर आज ग्रामविकास विभागाने दिले असून अभियान कालावधीत ८ लाख घरे बांधण्याचे उद्दिष्ट विभागाने निश्चित केले होते. ... त्यांचे हक्काचे घर मिळवून दिले आहे. त्याबद्दल मी यंत्रणेत काम करणाऱ्या सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करतो. आतापर्यंत १५ लाख लोकांच्या डोक्यावर महाआवास अभियानातील घरकुलांनी छत उपलब्ध करून देताना सुरक्षित केले आहे, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**प्रत्येक कुटुंबाला घर देणार – हसन मुश्रीफ**

महाआवास अभियानांतर्गत ४० लाख लोकांना घरकुलाचे छत मिळाले आहे. भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्यात आली. गवंडी प्रशिक्षण, घरकुल मार्ट, बहुमजली इमारती, गृहसंकुले यांसारखे वेगवेगळे प्रयोग करून घरांचा दर्जा चांगला राहील यासाठी दक्षता घेण्यात आली. आता चालू वर्षात प्रतीक्षा यादीतील लाभार्थ्यांनाही घरे देण्यात येतील. राज्यात ग्रामीण भागात स्वतःचे घर नाही असे एकही कुटुंब बाकी राहू देणार नाही, असे हसन मुश्रीफ यांनी यावेळी सांगितले. यावेळी सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे, ग्रामविकास राज्यमंत्री अब्दुल सत्तार आदी उपस्थित होते.

---



मुंबई : ग्रामविकास विभागामार्फत राबविण्यात आलेल्या महाआवास अभियानांतर्गत घरकुलाची चावी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते लाभार्थ्यास देण्यात आली. यावेळी ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ, सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे, ग्रामविकास राज्यमंत्री अब्दुल सत्तार आदी उपस्थित होते.

# आठ लाख कुटुंबांना विक्रमी वेळेत घरे देऊन ग्रामविकास खात्याची कौतुकास्पद कामगिरी

मुख्यमंत्र्यांचे गौरवोद्‌गार; ४० लाखांना मिळाले हक्काचे छत : मुश्रीफ

... राज्यभरातील एकूण ३ लाख २२ हजार १२९ लाभार्थ्यांना त्या त्या ... ६७ हजार ९५३ घरांचे काम एक महिन्यात पूर्ण होणार असल्याचे सांगून ... असे एकही कुटुंब बाकी राहू देणार नाही.

---

मुख्यमंत्र्यांकडून 'ग्रामविकास'ची प्रशंसा : ३.२३ लाख लाभार्थ्यांचा गृहप्रवेश

# विक्रमी वेळेत घरकुले देण्याची कामगिरी कौतुकास्पद

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : महाआवास अभियानांतर्गत राज्यातील आठ लाख लाभार्थ्यांना वेळेत घरकुले बांधून देण्याचे ग्रामविकास विभागाचे कामगिरी कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्‌गार मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मंगळवारी काढले. महाआवासांतर्गत ३.२३ लाख लाभार्थ्यांना ई गृहप्रवेश केला. मुख्यमंत्री ठाकरे यांच्या हस्ते मुंबईत प्रातिनिधीक स्वरूपात त्यांना घरकुलांच्या चाव्या देण्यात आल्या.



लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरुपात चाव्यांचे वाटप मंगळवारी मुंबईत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते झाले. यावेळी ग्रामविकास राज्यमंत्री अब्दुल सत्तार, ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ, सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे उपस्थित होते.

मागील दीड वर्षांपासून राज्य कोरोनाच्या संकटाशी लढत असताना आपण नागरिकांना घरात राहा, सुरक्षित राहा असे आवाहन करत होतो; परंतु घर नसलेल्यांनी घरात कसे राहायचे, भूमीहिनांनी घरात सुरक्षित कसे राहायचे हा प्रश्न होता, ज्याचे उत्तर आज ग्रामविकास विभागाने दिले आहे. ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले की, कोरोनाचे संकट असतानाही सर्व यंत्रणेने एकजुटीने हे अभियान यशस्वी केले. भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्यात आली. गवंडी प्रशिक्षण, घरकुल मार्ट, बहुमजली इमारती, गृहसंकुले यांसारखे वेगवेगळे प्रयोग करून घरांचा दर्जा चांगला राहील यासाठी दक्षता घेतली. यावेळी सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे, ग्रामविकास राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांनी मनोगत व्यक्त केले. मुख्यमंत्री ठाकरे यांच्या हस्ते 'महाआवास अभियान-यशोगाथा' या पुस्तिकेचे आणि राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाची दिनदर्शिका (शैक्षणिक वर्ष) चे प्रकाशन करण्यात आले. त्याचबरोबर 'महा आवास' संकेतस्थळाचा प्रारंभही करण्यात आला. यावेळी खासदार राहुल शेवाळे, खासदार विनायक राऊत, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आशिषकुमार सिंह, विभागाचे अपर मुख्य सचिव राजेशकुमार, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, आदी उपस्थित होते.

**कोल्हापुरातील चार लाभार्थ्यांना चाव्या**

कोल्हापूर जिल्ह्यात महाआवास अभियानांतर्गत २ हजार ७५७ घरकुले तयार करण्यात आली आहेत. त्यापैकी करवीर तालुक्यातील चार लाभार्थ्यांना मंगळवारी या ऑनलाईन कार्यक्रमात चाव्या देण्यात आल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमात जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी अजयकुमार माने व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक रवि शिवदास यांच्याहस्ते करवीर तालुक्यातील मौजे पासार्डे येथील वंदना कांबळे, वसगडे येथील प्रकाश गायकवाड, वाशीतील श्रीमती तारुबाई दत्तू पाटील आणि नागरवाडी येथील श्रीमती संगीता गायकवाड यांना घरकुलाच्या चाव्या दिल्या.

---

# घरकुल लाभार्थ्यांचा ई गृहप्रवेश : पालकमंत्री यांच्या हस्ते घरकुलांच्या चाव्यांचे वितरण

नांदेड : केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना आणि इतर राज्य पुरस्कृत व महा आवास योजनेअंतर्गत घरकुल लाभार्थ्यांना आज प्रातिनिधिक स्वरूपात घरकुलांच्या चाव्या वितरणाचा कार्यक्रम राज्यभर घेण्यात आला राज्य स्तरावर झालेल्या कार्यक्रमात राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती होती. तर जिल्हास्तरीय कार्यक्रम देगलूर येथे संपन्न झाला. यावेळी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते लाभार्थ्यांना घरकुलांच्या चाव्यांचे वितरित करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्षा मंगाराणी अंबुलगेकर, आमदार अमरनाथ राजूरकर, आमदार मोहनराव हंबर्डे, बांधकाम सभापती संजय बेळगे, समाज कल्याण सभापती रामराव नाईक, देगलूर पंचायत समितीचे सभापती शिवाजीराव बळेगावकर, गट विकास अधिकारी राजकुमार मुक्कावार आदींची उपस्थिती होती.



महा आवास अभियानांतर्गत जिल्ह्यात सुमारे ५ हजार १२६ लाभार्थ्यांचे घरकुल पूर्ण झाले आहेत. त्यापैकी आज जिल्ह्यात विविध ठिकाणी घेण्यात आलेल्या गृहप्रवेशाच्या कार्यक्रमात प्रातिनिधिक स्वरूपात ८५ लाभार्थ्यांना चाव्यांचे वितरण करण्यात आले. तालुकास्तरावर झालेल्या कार्यक्रमात पंचायत समिती सभापती, गटविकास अधिकारी, लोकप्रतिनिधी, सरपंच आदिंनी लाभार्थ्यांना चाव्यांचे वितरण केले.

हिंगोली

---



कोल्हापूर : महाआवास अभियान अंतर्गत ई-गृहप्रवेश कार्यक्रमात लाभार्थ्यांना घरकुलाच्या चाव्या प्रदान केल्या.

# नवे घर कोरोनामुक्त ठेवा

मुख्यमंत्री ठाकरे; जिल्ह्यात चार लाभार्थी

कोल्हापूर, ता. १५ : महाआवास अभियान - ग्रामीण अंतर्गत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते झालेल्या ई-गृहप्रवेश कार्यक्रमात स्वतःच्या घरात प्रवेश करणाऱ्या लाभार्थ्यांना मनापासून शुभेच्छा व्यक्त करतानाच, मिळालेले घर कोरोनामुक्त ठेवावे, असा संदेश मुख्यमंत्र्यांनी मुंबई येथील मुख्य कार्यक्रमात दिला. हा कार्यक्रम एकाच वेळेला राज्यात झाला.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयात हा कार्यक्रम ऑनलाईन झाला. यावेळेस जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी अजयकुमार माने व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक रवि शिवदास यांच्या हस्ते जिल्ह्यातील चार लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात त्यांच्या हक्काच्या घरकुलाच्या चावीचे वितरण केले. यामध्ये करवीर तालुक्यातील मौजे पासार्डे येथील श्रीमती वंदना कांबळे, वसगडे येथील प्रकाश गायकवाड, वाशीतील श्रीमती तारूबाई दत्तू पाटील आणि नागरवाडी येथील श्रीमती संगीता गायकवाड यांना घरकुलाची चावी प्रदान करण्यात आली.

जिल्ह्यात अभियानांतर्गत सुमारे २ हजार ७५७ घरे तयार झाली आहेत. ऑनलाईन प्रणालीव्दारे झालेल्या या कार्यक्रमात जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या स्तरावर प्रधानमंत्री आवास योजना आणि रमाई आवास योजनेतील प्रत्येकी दोन -दोन लाभार्थ्यांना घरकुलाची चावी दिली. यावेळी ज्ञानदेव मडके, राजेंद्र जाधव, माया सुर्वे, चंद्रकांत पाटील, राजू कवडे आदी उपस्थित होते.

---

# महाआवासमध्ये पाच हजार घरकुले पूर्ण

पालकमंत्री संदीपान भुमरे यांच्याकडून मदतीचे आश्वासन

सकाळ वृत्तसेवा

यवतमाळ, ता. १६ : जिल्ह्यात २० नोव्हेंबर २०२० ते ५ जून २०२१ या अल्पकालावधीत जिल्हा परिषदेने महाआवास अभियान (ग्रामीण) अंतर्गत तब्बल पाच हजार ५६५ घरकुलांचे काम पूर्ण करून राज्यात पहिल्या पाचमध्ये क्रमांक पटकावला ...



यवतमाळ : घरकुलाचे प्रमाणपत्र देताना पालकमंत्री संदीपान भुमरे.

... अमोल येडगे, नगराध्यक्षा कांचन चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, पोलिस अधीक्षक डॉ. दिलीप पाटील भुजबळ, उपाध्यक्ष बाळासाहेब कामारकर, शिक्षण सभापती श्रीधर मोहोड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके प्रामुख्याने उपस्थित होते. ... पालकमंत्री म्हणून सर्वतोपरी मदत करू, असे आश्वासनही श्री. भुमरे यांनी दिले. जिल्हा परिषद अध्यक्षा कालिंदा पवार, खासदार गवळी, जिल्हाधिकारी येडगे, सीईओ डॉ. पांचाळ, यांनीही मनोगत व्यक्त केले. ... ९० घरकुलांना अनुदानाचा पहिला हप्ता देण्यात आला आहे. शिवाय १,०७० भूमिहिन लाभार्थ्यांना घर बांधण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली. ९७० ग्रामीण गवंड्यांना प्रशिक्षण देण्यात आले, तर एक हजार ३२५ ग्रामीण गवंड्यांचे प्रशिक्षण प्रगतीपथावर आहे.

---

# Homeless get 3L houses under state hsg scheme

Mumbai: Following the construction of 3.23 lakh houses, the state government handed them over to homeless people in rural areas on Tuesday.

The houses were built in the last seven months under the Maha Awas Yojna, a state housing scheme for the homeless.

Chief minister Uddhav Thackeray on Tuesday handed over the keys to a few beneficiaries during an event held at 'Sahyadri' government guest house in Mumbai.

"Promise to keep your house Covid-free as this will lead to make a Corona-free village and subsequently the entire state," said Thackeray. TNN

---

अचलपूर पंचायत समिती महाआवास अभियनाचा प्रारंभ

# घरकुल मंजुरीसाठी प्रशासन लाभार्थ्यांच्या दारी



---

# लाभार्थियों को दीं चाबियां

पंस में गृहप्रवेश ई–चाबी हस्तांतरण कार्यक्रम संपन्न



---

# महाआवासाअंतर्गत ७.४१ लाख घरकुले

मुश्रीफ; तीन लाख ६२१ पूर्ण; ४.४१ घरकुले प्रगतिपथावर

सकाळ वृत्तसेवा

**अभियानात सहभागाचे आवाहन**

यापुढील काळातही घरकुलचे महाआवास अभियान मिशन मोडवर राबवून ग्रामीण भागातील सर्व बेघरांना आदर्श पद्धतीची घरकुले उपलब्ध करून देण्यात येतील. अभियानात सर्व लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थांनी सहभाग घेऊन ते यशस्वी करावे, असे आवाहन मंत्री श्री. मुश्रीफ यांनी केले.



हसन मुश्रीफ

कोल्हापूर, ता. १ : राज्यातील ग्रामीण भागातील घरकुल बांधकामांना चालना देण्यासाठी साडेचार महिन्यांत राबविलेल्या महाआवास अभियानात राज्यात सात लाख ४१ हजार घरकुलांचे बांधकाम केले असून, त्यापैकी तीन लाख ६२१ घरकुले बांधून पूर्ण झाली आहेत, तर चार लाख ४० हजार ९२४ घरकुलांचे बांधकाम प्रगतिपथावर आहे, अशी माहिती ग्रामविकासमंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली. अभियानाचे यश पाहता अभियानास १ मे २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत असल्याचेही श्री. मुश्रीफ यांनी जाहीर केले.

मंत्री मुश्रीफ म्हणाले, की प्रगतिपथावर असलेल्या घरकुलांपैकी दोन लाख ८२ हजार २३२ घरकुलांचे बांधकाम जोत्यापर्यंत (प्लिंथपर्यंत), तर एक लाख ५८ हजार ६९२ घरकुलांचे बांधकाम लिंटेलपर्यंत झाले आहे. अभियान कालावधीत ४२ हजार ६५७ भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध करून दिली आहे.

अभियान कालावधीत तीन लाख ८५ हजार ५१८ लाभार्थ्यांच्या घरकुलांना नव्याने मंजुरी दिली. वेळेत घरकुले पूर्ण व्हावी व बांधकामासाठी गवंड्यांची कमतरता भासू नये, यासाठी गवंडी प्रशिक्षणही राबविण्यात येत आहे. आजअखेर सहा हजार १६५ गवंडी प्रशिक्षित केले असून, १५ हजार ८५५ गवंडी प्रशिक्षण प्रगतिपथावर आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत चार कोटी सहा लाख ३७ हजार २०१ इतके मनुष्यदिवस निर्मिती केली. स्वच्छ भारत मिशनअंतर्गत सहा लाख ३७ हजार ९७४ लाभार्थ्यांना घरकुलाबरोबर शौचालयाचा लाभ दिला. जलजीवन मिशनअंतर्गत चार लाख ६८ हजार ३५१ लाभार्थ्यांना नळाद्वारे पाणीपुरवठ्याचा लाभ दिला. प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेंतर्गत तीन लाख ४७ हजार ७५१ लाभार्थ्यांना गॅसजोडणीचा लाभ दिला.

सौभाग्य योजनेंतर्गत तीन लाख १९ हजार ६४८ लाभार्थ्यांना वीजजोडणीचा लाभ दिला. राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत तीन लाख ४४ हजार ८३४ लाभार्थ्यांना उपजीविकेचे साधन मिळवून देण्यासाठी काम केले आहे.

---

लोकसत्ता प्रतिनिधी

सरकारी योजनेतून उभारणाऱ्या बांधकामांचे सुशोभीकरण; वारली कलेचेही संवर्धन

# ग्रामीण भागांतील घरांवर वारली कलेचा साज

ठाणे : वारली कलेसाठी ओळखल्या जाणाऱ्या ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात यापुढे पंतप्रधान आवास योजना तसेच घरकुल योजनेच्या माध्यमातून उभ्या राहाणाऱ्या घरांवर तसेच इमारतींवर यापुढे वारली चित्रांचा, शिल्पांचा साज दिसणार आहे. ही कला जतन व्हावी आणि योग्य पद्धतीने जोपासली जावी यासाठी जिल्हा परिषदेने पुढाकार घेतला आहे. लाभार्थ्यांना वारली कलेविषयी आवड निर्माण करण्यासाठी ठाणे जिल्ह्यात प्रत्येक तालुक्यामध्ये एक 'डेमो हाऊस' बांधले आहे. तसेच आपल्या घरांवर वारली चित्र रेखाटण्याची इच्छा असणाऱ्यांना तशी सुविधाही उपलब्ध करून दिली जाणार आहे.



(पान ४ वर)

**गृहस्वप्नाची पूर्ती**

- ठाणे जिल्ह्यात पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत २०१६-१७ ते २०२०-२१ या कालावधीत सहा हजार ७०४ घरांना मंजुरी देण्यात आली. त्यापैकी ४१२ घरकुलांना महाआवास अभियानाच्या काळात मंजुरी देण्यात आली.
- मंजूर घरांपैक सहा हजार १५७ घरे बांधून पूर्ण झाली असून त्यातील ७२८ घरे महाआवास योजनेच्या काळात पूर्ण करण्यात आली.
- राज्य पुरस्कृत योजने अंतर्गत २०१६-१७ ते २०२०-२१ या कालावधीत तीन हजार ४९० घरकुले मंजुर करण्यात आली आहेत. त्यापैकी महाआवास अभियान कालावधीत २२८ घरकुले मंजूर करण्यात आली. मंजूर घरकुलांपैकी तीन हजार १५४ घरकुले पूर्ण बांधून झाली असून त्यापैकी ५०४ घरकुले हे महाआवास अभियान कालावधीत बांधून पूर्ण झाली आहेत, अशी माहिती जिल्हा परिषदेतर्फे देण्यात आली.

---

# जिल्ह्यातील बारा हजार नागरिकांची झाली 'स्वप्नपूर्ती'

ग्रामविकास महाआवास अभियान-ग्रामीणच्या माध्यमातून १२ हजार ५५६ घरे उभारणी



अहमदनगर : स्वतःचं घर असावं हे प्रत्येकाचं स्वप्न असतं. ... दि.२० नोव्हेंबर, २०२० ते ५ जून, २०२१ या कालावधीत राबविलेल्या ... जिल्ह्यात तब्बल १२ हजार ५५६ नागरिकांचे गृहस्वप्न पूर्ण झाले. ...

---

# E-Home Entry Program for Beneficiaries



NER/PRASHANT UGHADE 16 June : Rural Development Department conducted a program distributing 3 lakh keys to home beneficiaries under the Maha Awas Abhiyan at Sahyadri Atithi gruh in Mumbai at the hands of CM Udhavji Thackeray. In that connection, a program was organized in Ner Panchayat Samiti to transfer the keys to the house beneficiaries. On this occasion, four beneficiaries from the taluka who completed their house construction in time-bound manner were selected to give this honour. The beneficiaries named Ramesh Narayan Varkande of Sonwadhona, Shalini Gopal Sringare and Babarao Jayaram Sringare of Bangaon and Vinod Pandurang ji Kapase of Mangladevi received the keys at the hands of dignitaries. On this occasion, chairman of Panchayat Samiti Mrs. Madhumati Chavan, Deputy chairman Ramesh Burande, Panchayat Samiti Member Bhimrao Khobragade, Block Development Officer Ujwala Dhole, Extension officer Ashish Raut were present. All these dignitaries Congratulated the beneficiaries. Ankush Ajmire, Akash Pawaskar, Babita Rathod and Vanita Ingole took efforts to make this programme successful.

---

# Govt extends 'Maha Awas Abhiyan' till next month

EXPRESS NEWS SERVICE
MUMBAI, APRIL 1

THE MAHARASHTRA government has decided to extend till May its 'Maha Awas Abhiyan' campaign, launched last November, to speed up the implementation of all rural housing programmes, including the Prime Minister Awas Yojana.

The campaign was taken up by the state rural development department, which in a press release said on Wednesday that in the four months since the campaign was launched, construction of 7.41 lakh rural houses was taken up under the Pradhan Mantri Awas Yojana and state-sponsored Gharkul Yojana.

Sharing the data between November 20, 2020 and March 31, 2021, Rural Development Minister Hasan Mushrif said: "In four months, we have achieved the target of 7.41 lakh houses. Of these, 3.62 lakh have been constructed. The remaining 4.4 lakh houses are in various phases of construction." The extension will help in the completion of the remaining houses, he added.

"Also, 42,657 landless people have been provided land under Gharkul Yojna. The process of handing over land to 63,000 landless poor for construction of houses is underway."

---

# गाव कोरोनामुक्त करण्याचा ध्यास घ्या : जिल्हाधिकारी जयवंशी यांचे प्रतिपादन

हिंगोली/प्रतिनिधी : घरकुल लाभार्थ्यांनी घरकुल परिसरात वृक्षारोपण करून त्याचे संवर्धन करावे तसेच मुख्यमंत्री यांच्या सूचनेनुसार कोरोना नियमांचे पालन करून कोरोना संसर्गापासून आपले गाव कोरोनामुक्त करण्याचा ध्यास घ्यावा असे प्रतिपादन जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी यांनी घरकुल लाभार्थ्यांना ई गृहप्रवेश देताना मंगळवारी केले आहे.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या व्हीसी मध्ये मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्यातील जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांशी संवाद साधला. यावेळी ग्रामीण घरकुल योजनेस गतिमानता मिळावी या उद्देशाने राबविण्यात आलेल्या महाआवास अभियान २०२०- २०२१ अंतर्गत घरकुल बांधणाऱ्या लाभार्थ्यांचे ग्रहप्रवेश करण्यासाठी आयोजित ऑनलाईन कार्यक्रमात मुंबई येथुन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ, महसूल मंत्री अब्दुल सत्तार, सामाजिक व न्याय मंत्री धनंजय मुंढे, ग्रामविकास सचिव महेश कुमार तसेच संचालक राजाराम दिघे, तसेच इतर मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला.



यावेळी ऑनलाइन कार्यक्रमात मुख्यमंत्री यांनी सर्व जिल्ह्यातील घरकुल लाभार्थ्यांचे अभिनंदन करून प्रातिनिधिक स्वरुपात काही लाभार्थ्यांना घरकुलाची चाबी प्रदान केली. हिंगोलीतील कैलास रामचंद्र वसू रा.वडद, विनोद कुंडलिक सोनवणे रा.इंचा, सागराबाई नारायण गायकवाड रा.बळसोंड तिन लाभार्थ्यांचा प्रातिनिधिक स्वरुपात ई गृहप्रवेश व सत्कार जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी, मुख्य कार्यकारी अधिकारी राधाबीनोद शर्मा तसेच प्रकल्प संचालक धनवंत माळी यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच हिंगोली येथून या कार्यक्रमास घरकुलाचे कर्मचारी जिल्हा प्रोग्रामर गणेश पाटील, सचिन इंगोले, फराहनोद्दिन सय्यद, संतोष काळे, ग्रामीण अभियंता देवकर, समिर गायकवाड आदींची उपस्थिती होती.

---

# ग्रामीण महाआवास अभियानाला मुदतवाढ

ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांची माहिती, पात्र लाभार्थ्यांना पावसाळ्यापूर्वी गृहप्रवेश

विशेष प्रतिनिधी/मुंबई



---

# इंदापुरकरांनी अनुभवला माणसातला देव माणुस

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद यांच्या सारथ्याने भारावले ग्रामस्थ



---

# महा आवास अभियान (ग्रामीण) अंतर्गत लाभार्थ्यांचा 'ई - गृहप्रवेश'

पं.स. उपसभापती विलास दशमुखे यांच्याहस्ते लाभार्थ्यांचा सत्कार

गडचिरोली • आज १५ जून रोजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्याहस्ते महाआवास अभियान 'ग्रामीण' अंतर्गत ई - गृहप्रवेश कार्यक्रमाचे प्रक्षेपण करण्यात आले. या अंतर्गत स्थानीक पंचायत समितीमध्ये ...



यावेळी पंचायत समितीचे उपसभापती विलास दशमुखे यांच्याहस्ते लाभार्थ्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच ...



पंचायत समिती भोर येथे ग्रामीण आवास योजनेच्या लाभार्थ्यांच्या गृहप्रवेश प्रसंगी मा.खासदार, श्रीमती सुप्रिया सुळे प्रातिनिधीक स्वरुपात लाभार्थ्यांना घराची चावी प्रदान करताना




पंचायत समिती देगलूर येथे ग्रामीण आवास योजनेच्या लाभार्थ्यांच्या गृहप्रवेश प्रसंगी मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम, श्री.अशोक चव्हाण प्रातिनिधीक स्वरुपात लाभार्थ्यांना घराची चावी प्रदान करताना



यवतमाळ येथे ग्रामीण आवास योजनेच्या लाभार्थ्यांच्या गृहप्रवेश प्रसंगी मा.मंत्री, रोजगार हमी व फलोत्पादन, श्री.संदीपान भुमरे प्रातिनिधीक स्वरुपात लाभार्थ्यांना घराची चावी प्रदान करताना




पंचायत समिती पुरंदर येथे ग्रामीण आवास योजनेच्या लाभार्थ्यांच्या गृहप्रवेश प्रसंगी मा.आमदार, श्री.संजय जगताप प्रातिनिधीक स्वरुपात लाभार्थ्यांना घराची चावी प्रदान करताना

“महाराष्ट्र शासनाचा एकच ध्यास,
२०२२ पर्यंत सर्वांसाठी आवास”




**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**
४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४
Email ID : directoriayruralhousing@gmail.com
दुरध्वनी क्र. : ०२२-२७५६१८२४